॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
**श्रीराम बोरवेल्स**
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.No./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२०३ ■ रविवार २६ एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

**आकर्षक लग्न पत्रिका**
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
**श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्**
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

**विशेष संपादकीय**

## ना. देवेंद्रजी फडणवीसांची तळमळ जिल्हा पातळीवर जे घडते ते वेगळेच

ना.देवेंद्रजी फडणवीस यांचे आम्ही धुळे जिल्ह्यात स्वागत करतो. राज्याचा विकास हा केंद्रस्थानी ठेवून अनेक उपाययोजना राज्याचे मुख्यमंत्र्यांना वेळोवेळी करावे लागतात. या उपायोजना करताना त्यांचे नजरेसमोर संपूर्ण महाराष्ट्र व जनतेच्या गरजा या डोळ्यासमोर असतात. हेतू चांगला असला तरी जिल्हा पातळीवर नक्की काय घडते याची तंतोतंत माहिती पोहोचेलच असे आम्ही मानत नाही. अश्या परिस्थितीत धुळे जिल्ह्याचे पत्रकार म्हणून काही बाबी त्यांच्या नजरेस आणून देण्याचे धाडस आम्ही करीत आहोत.

धुळे जिल्ह्यात पोलीस अधीक्षकांच्या बदलीमुळे जागा रिक्त झाली आहे. नवीन येणाऱ्या पोलीस अधीक्षकांची नावे सोशल मीडिया व पोलीसांमधे चर्चेत आहेत. मात्र त्यांची बदली कशाच्या आधारे धुळे जिल्ह्यात होणार आहे, याची थक्क करून देणारी आकडेवारी देखील या चर्चेतून पुढे येते आहे. एका सर्वसामान्य नागरिकाला या सगळ्याशी काही घेणे देणे, नसले तरी शेवटी जो आर्थिक टॅक्स चुकवून त्यांना इथे बदली करून आणले जाते त्याची वसुली देखील इथल्या जनतेकडून होणार हे वेगळेपणाने सांगण्याची आवश्यकता नाही. या सगळ्या घडामोडींची आम जनतेचा संबंध येत नसला तरी त्याचा त्रास मात्र जनतेला सहन करावा लागतो. यामुळे चांगल्या सक्षम अधिकाऱ्याची धुळ्याला बदली करा असे राज्याचे गृहमंत्री म्हणून आमची आपल्याला कळकळीची विनंती आहे.

धुळे जिल्ह्यात माजी पोलीस अधीक्षक बारकूंड हे काम बघत होते. त्यांच्या काळात सर्वांना थक्क करून टाकणाऱ्या अनेक भ्रष्टाचाराच्या घटणा धुळे जिल्ह्यातील जनतेने बघितले. जीएसटी प्रकरणात पोलीस कर्मचाऱ्यांच्या नेमणूक खात्याची गाडी दिली. जीएसटी अधिकारी असल्याचे बतावणी करत पैसे काढण्याची प्रकरणे बाहेर आली. शहराचे माजी डी.वाय.एस.पी. ऋषिकेश रेड्डी यांनी या प्रकरणांची सखोल चौकशी केली. विशेष म्हणजे या प्रकरणात खुद्द पोलिस अधीक्षकांचे नाव जीएसटी प्रकरणात उघड झाले. यावेळी आपला महाराष्ट्रने दिलेल्या अग्रलेखांची दखल घेत आपण माजी पोलीस अधीक्षक बारकुंड यांची तातडीने नाशिक पिटीसीला बदली केली. याबद्दल धुळे जिल्ह्यातील जनतेच्यावतीने आम्ही आभारी आहोत. मात्र या प्रकरणात पोलीस अधीक्षक बारकूंड यांच्या संदर्भामध्ये सुरू झालेली कारवाई दाबून टाकण्यात आली, हे खेदाने सांगावसं वाटते. ही कारवाई का थांबवण्यात आली याचा शोध घेणे आवश्यक असून अशा प्रकरणांमुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांची हिम्मत वाढते आहे, हेच आम्हाला या ठिकाणी आपल्या नजरेस आणून द्यायचे आहे. (पान ८ वर)

### पार्टी योग्य असती तर चड्ढा गेले नसते; हजारे

अहिल्यानगर, दि.२५- आम आदमी पार्टीचे सात राज्यसभा खासदार भाजपमध्ये सामील झाल्याच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यात पत्रकारांशी बोलताना अण्णांनी या फुटीला पक्षाची चुकीची कार्यपद्धती जबाबदार असल्याचे म्हटले आहे. अण्णा हजारे म्हणाले की, लोकशाहीमध्ये कोठे जायचे आणि कोठे राहायचे, हा प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक अधिकार आहे. राघव चड्ढा आणि इतर खासदारांना पक्षात काहीतरी मोठ्या अडचणी आल्या असतील, म्हणूनच त्यांनी हा निर्णय घेतला असावा. अण्णांनी थेट आपच्या नेतृत्वावर बोट ठेवत म्हटले, हा दोष पक्षाचा आणि संघटनेचा आहे. जर पक्षाचे कामकाज योग्य मार्गाने आणि तत्त्वांना धरून चालले असते, तर (पान ८ वर)

# अमरीशभाईंसारखे नेते देशाचे भूषण : मुख्यमंत्र्यांचे गौरवोद्गार
## तपनभाई पटेल हॉस्पिटलसह विविध विकासकामांचे उद्घाटन

**शिरपूर, दि.२५ (का.प्र.) : शिरपूरचे भाग्य थोर, म्हणून या मतदार संघाला अमरीशभाईंसारखे नेतृत्व लाभले. पढाई, दवाई आणि कमाई अर्थात शिक्षण, आरोग्य व रोजगारात त्यांनी शिरपूर प्रथम क्रमांकावर नेले. पंतप्रधानांच्या स्वप्नातील विकास भी और विरासत भी या संकल्पनेनुसार त्यांनी मूलभूत विकास पूर्ण केलाच शिवाय क्रांतीवीरांची स्मारके आणि देवतांची मंदिरे उभारुन संस्कृती जपण्याचे महत्त्वाचे कामही केले आहे. अमरीशभाईंसारखे नेते संपूर्ण देशाचे भूषण आहेत. मला शक्य असते तर अमरीशभाईंना मी चोरुन घेऊन गेलो असतो अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अमरीशभाई पटेल यांनी साकारलेल्या विकासकामांचा गौरव केला.**





शिरपूर तालुक्यातील खर्दे येथील स्व.तपनभाई पटेल मेमोरिअल हॉस्पिटलचे उद्घाटन २५ एप्रिलला सायंकाळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले. त्यानंतर शहरातील आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या मैदानावर त्यांची जाहीर सभा घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, आमदार शिरीष नाईक, आमदार राघवेंद्र पाटील, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राजेश पाडवी, आमदार मंजुळा गावित, आमदार आमश्या पाडवी, धुळ्याच्या महापौर माया परदेशी, माजी खासदार डॉ.सुभाष भामरे, डॉ. हीना गावित, शिरपूरचे नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, प्रा.शरद पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.तुषार (पान ८ वर)

## कावठीतील भवानी माता यात्रेत दोन गटात हाणामारी
## दोन्ही गटातील पंधराहून अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोनगीर दि.२५ (प्रतिनिधी) - धुळे तालुक्यातील कावठी येथे आयोजित भवानी मातेच्या यात्रा उत्सवा दरम्यान पाळण्यात बसताना मुलींकडे बघण्याच्या कारणावरून दोन गटात जोरदार हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या वादात दोन्ही गटांतील महिला व तरुण जखमी झाले आहेत. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंनी परस्पर विरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत. दोन्ही बाजूकडील १५ होऊन अधिक जणांविरुद्ध वेगवेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पितांबर भगवान शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार , २४ एप्रिल रोजी सायंकाळी ५:३० च्या सुमारास रथोत्सवादरम्यान वादाची ठिणगी पडली. सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्यांच्या कुटुंबातील मुली पाळण्यात बसत असताना, गावातील विशाल बाविस्कर, जयेश चव्हाण, विशाल शिंदे, लोकेश खैरनार आणि चंद्रकांत शिंदे यांनी मुलींकडे बघून अश्लील हावभाव केले. याचा जाब विचारला असता संशयितांनी फिर्यादीच्या पुतण्यांना व मुलींना धक्काबुक्की व मारहाण केली. विशेष म्हणजे, यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेले सरपंच पती गुलाब देवीदास शिंदे, शरद शिंदे आणि तंटामुक्ती अध्यक्ष देवानंद आधार शिंदे यांनी भांडण सोडवण्याऐवजी संबंधितांना मारहाण करण्यासाठी चिथावणी दिल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. या मारहाणीत कुणाल शिंदे, विक्की शिंदे, तेजस शिंदे, बिपीन शिंदे, ललिता शिंदे व भालचंद्र शिंदे हे जखमी झाले असून त्यांच्यावर हिरे मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.दुसरीकडे, ललिता नारायण बाविस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा विशाल हा पाळण्यात बसलेला असताना तेजस (पान ८ वर)

### मा.आ.वसंत सुर्यवंशी यांचे दुःखद निधन



साक्री, दि.२५- गरिब परिस्थितीतून प्रचंड संघर्ष करत राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे माजी आमदार वसंत दोधा सुर्यवंशी यांच्या निधनाने संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने एक जिद्दी, लढवय्या आणि सर्वसामान्यांचा खरा आधारवड हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. वसंतदादा सुर्यवंशी यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात चिपलीपाडा ग्रामपंचायत सदस्य सरपंच व विविध कार्यकारी सोसायटी चे सदस्य (पान ८ वर)

## चोवीस तासात घरफोडी उघडकीस
## नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेला यश

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- विसरवाडी हद्दीत घडलेल्या घरफोडी प्रकरणाचा २४ तासांच्या आत उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणात आरोपीकडून सुमारे ६२,हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

दि.२४ एप्रिल रोजी विसरवाडी पोलीस ठाण्यात फिर्यादी सरसावाडे गावातील रहिवासी यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या घरातून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व साहित्य चोरी केल्याची घटना घडली होती. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता.घटनेची गंभीर दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित आरोपी अमीन ममद्या गावीत (वय २०, रा. राजवडकोठा, ता. नवापूर, जि. नंदुरबार) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून ५३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एकूण ६२,००० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात यश आले आहे. या गुन्ह्याचा उलगडा २४ तासांच्या आत करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अपर (पान ८ वर)

## डॉ.अभिजित मोरे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी
## शहादा शहराध्यक्षांची आ.अनिल पाटलांकडे मागणी

**शहादा, दि.२५ (का.प्र.)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित दिलीपराव मोरे यांनी गेल्या पाच वर्षांपासून जिल्ह्यात पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी केलेले कार्य आणि मोरे परिवाराचे पक्षाप्रती असलेले योगदान विचारात घेता, त्यांना विधान परिषदेवर संधी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी शहादा शहराध्यक्ष सुरेंद्र ओंकार कुवर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी माजी मंत्री तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी आ. अनिल पाटील यांना लेखी निवेदन सादर केले आहे.**

नंदुरबार जिल्हा प्रभारी आ.अनिल पाटील यांना पदाधिकारींसह भेट घेऊन त्यांना सुरेंद्र कुवर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉ. अभिजित मोरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि निष्ठेने पक्षाची धुरा सांभाळली आहे. त्यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली नंदुरबार जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा उभारी घेतली असून पक्षाला उल्लेखनीय यश मिळाले आहे. विशेषतः जिल्ह्यातील नवापूर आणि तळोदा या दोन नगरपालिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने बहुमताने विजय मिळवला, याचे मुख्य श्रेय डॉ. मोरे यांच्या कुशल नियोजनाला जाते. जिल्ह्यात कोणताही विद्यमान आमदार किंवा खासदार नसताना त्यांनी स्वबळावर पक्षाची भक्कम ताकद निर्माण केली आहे.मोरे परिवाराची पक्षाप्रती असलेली निष्ठा पिढ्यानपिढ्यांची आहे. यापूर्वी त्यांचे वडील डॉ. दिलीपराव मोरे आणि त्यांच्या आजी डॉ. कमलाताई मराठे यांनीही जिल्ह्याचे नेतृत्व करत पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवली आहेत. ते या काळात पक्षाची स्थिती खालावलेली असताना, मध्ये डॉ. अभिजित मोरे यांनी जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी (पान ८ वर)

## धुळे जिल्हा वकील संघ अध्यक्षपदी ॲड.भामरे विजयी
## सचिवपदी ॲड.वाघ, ॲड.देशमुख; परिवर्तनची सरशी

**धुळे, दि.२५- धुळे जिल्हा वकील संघाच्या २०२६-२८ या कालावधीसाठी झालेल्या निवडणूकीत चुरशीची लढत पाहायला मिळाली. अध्यक्षपदी ॲड.राहुल भामरे यांनी विजय मिळवला असून उपाध्यक्षपदी ॲड.विशाल साळवे यांची निवड झाली आहे. सचिवपदी ॲड.बळीराम वाघ तर दुसरे सचिव म्हणून ॲड.प्रसाद देशमुख विजयी झाले आहेत. तर महिला उपाध्यक्ष ॲड. सुनिता शिंदे, महिला सचिव ॲड.भारती पाटील यांची निवड झाली. या सर्व निकालांमध्ये विशेष ठळक बाब म्हणजे ॲड.उमाकांत घोडराज यांनी सलग तिसऱ्यांदा कार्यकारणी सदस्यपदी विजय मिळवत आपली भक्कम पकड कायम ठेवली आहे.**



निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधित्वासह विविध पदांसाठी मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वकिलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत आपला मतदानाचा हक्क बजावला. संपूर्ण प्रक्रिया शांततेत व उत्साहात पार पडली. यंदाच्या निवडणुकीत आपलं पॅनल आणि परिवर्तन पॅनल यांच्यात थेट लढत झाली. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात दोन्ही पॅनलकडून जोरदार संपर्क मोहिमा राबवण्यात आल्या. अपक्ष उमेदवारांमुळे काही ठिकाणी चुरस वाढली आणि निकालावर त्याचा परिणामही जाणवला.

ॲड.उमाकांत बाबूराव घोडराज यांची हॅट्रीक

वकील संघातील सक्रिय, अभ्यासू आणि सामाजिक भान असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या ॲड.उमाकांत घोडराज यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. त्यांच्या कामावर आणि नेतृत्वावर वकिलांनी पुन्हा एकदा विश्वास दाखवला असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले.

विजयी उमेदवार- अध्यक्ष ॲड.राहुल भामरे (६३१), उपाध्यक्ष ॲड.विशाल साळवे (४५६), सचिव ॲड.बळीराम वाघ (५१९), दुसरे सचिव प्रसाद देशमुख (६५६), महिला उपाध्यक्ष ॲड.सुनिता शिंदे (५५६), महिला सचिव ॲड.भारती पाटील (६९१) यांची निवड झाली.

निवड झालेले कार्यकारणी सदस्य- ॲड.उमाकांत घोडराज (सलग तिसऱ्यांदा विजयी) (५०९), ॲड.भुषण सुर्यवंशी (७६६), ॲड.निलेश कुलकर्णी (६९६), ॲड.संतोष केदार (६५८), ॲड.मंथन साळुंखे (६१३), ॲड.सौरभ मतकर (५६०), ॲड.पवन सूर्यवंशी (६४१), ॲड.कल्पेश पाटील (५४६), ॲड.नितीन पाटील (४८८) तर महिला सदस्य ॲड.दीपाली सकट (४३२), ॲड.गिता डोंगरे (५२९) अशी नवीन कार्यकारणी निवडून आली आहे. (पान ८ वर)

## आ.राहुल ढिकले यांच्या पत्नी आदितीताई ढिकले यांचे निधन

**नाशिक, दि.२५- नाशिक पुर्व विधानसभा मतदारसंघाचे आ.ॲड.राहुल ढिकले यांच्या पत्नी आदितीताई ढिकले (वय ४०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आज शनिवार (दि.२५) सकाळी निधन झाले. आदिती ढिकले यांच्यावर सायंकाळी गणेशवाडी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.**



अदिती ढिकले यांची शुक्रवारी सायंकाळी अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना तत्काळ एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती आणि एक मुलगा असा परिवार आहे. या घटनेमुळे आमदार राहुल ढिकले यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एका शासकीय कार्यक्रमानिमित्त त्र्यंबकेश्वरच्या दौऱ्यावर आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या गोदा ते नर्मदा जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे शुभारंभ झाला. त्यानंतर फडणवीसांना (पान ८ वर)

### माता रमाई स्मारकासाठी जागा द्या- आरपीआय

धुळे, दि.२५- धुळे महानगरपालिका आवारात त्यागमुर्ती माता रमाई यांच्या स्मारकासाठी जागा मिळावी. या मागणीचे निवेदन आरपीआय आठवले गटाच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर मायादेवी परदेशी यांना दिले. निवेदनात नमुद केले आहे की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमुर्ती माता रमाई यांच्या त्यागामुळेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान निर्माते झाले. भारतातील करोडो बहुजनांचे तारणहार झाले. त्यांच्या त्यागाचे मोल होवू शकत नाही. त्यागाची महती पहाता त्यागमुर्ती माता रमाई (पान ८ वर)

## गृहगणनेसाठी आठशे एकोणनव्वद कर्मचाऱ्यांची मनपाने केली नियुक्ती

**धुळे, दि.२५- कोरोना प्रादुर्भाव आणि विविध प्रशासकीय कारणांमुळे प्रलंबित असलेली जनगणनेची प्रक्रिया आता धुळे महानगरपालिका क्षेत्रात वेगाने सुरू झाली आहे. येत्या १६ मे पासून शहरात प्रत्यक्ष घरगणनेला प्रारंभ होणार असून, या मोहिमेसाठी एकूण आठशे एकोणनव्वद अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जनगणना विभाग प्रमुख रविकिरण पाटकरी यांनी दिली.**



जनगणना प्रक्रिया पारदर्शक आणि प्रभावीपणे राबवण्यासाठी महापालिका प्रशासन सज्ज झाले आहे. आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी नितीन कापडणीस यांनी बुधवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत या कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी चार्ज अधिकारी किशोर शिंदे, सागर जकातदार, किशोर वाघ, राजेंद्र माईनकर यांसह अन्य अधिकारी उपस्थित होते. महानगरपालिका हद्दीतील जनगणनेसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली असून त्यासाठी प्रगणक सातशे सत्तेचाळीस कर्मचारी, पर्यवेक्षक एकशे पंचवीस अधिकारी, फील्ड ट्रेनर सतरा तज्ज्ञांचा समावेश आहे.

या सर्व कर्मचाऱ्यांना २३ एप्रिलपासून तीन टप्प्यांत प्रशिक्षण दिले जात आहे. सध्या पहिल्या टप्प्यात ३२५ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सुरू आहे. प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

यंदाच्या जनगणनेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे डिजिटल स्वगणना नागरिकांना १ ते १५ मे या कालावधीत स्वतःची माहिती ऑनलाइन नोंदविता येणार आहे. नागरिकांनी या संकेतस्थळावर जाऊन ३३ प्रश्नांची उत्तरे भरायची आहेत. एसइआयडी क्रमांक फॉर्म सबमिट केल्यानंतर मोबाईलवर एक एसइआयडी क्रमांक प्राप्त होईल. १६ मे नंतर जेव्हा प्रगणक आपल्या घरी येतील, तेव्हा त्यांना हा क्रमांक दाखवणे अनिवार्य असेल. १६ मे ते १८ जून या महिनाभराच्या कालावधीत प्रगणक घरोघरी भेट देऊन माहिती संकलित करतील. शहराच्या नियोजनासाठी आणि विकासकामांसाठी जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा आधार असतो. त्यामुळे धुळेकर नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

### मनपा वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे कार्यशाळा

धुळे, दि.२५- मनपा वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे पीसीपीएनडीटी व एमटीपी जनजागृती स्त्री जन्माचे स्वागत करा कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत स्त्री जन्माचे स्वागत करा चळवळीच्या आद्यप्रवर्तक डॉ. सुधा कांकरीया यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम मनपाच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आला. याप्रसंगी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी सभापती लताबाई पोतदार, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, उपसभापती शोभाबाई भिल, आयुक्त नितीन कापडणीस, अतिरिक्त आयुक्त करूणा डहाळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी उपस्थित होते.

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,39,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,500 रु.+3% GST
चांदी- 2,49,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## ग्रा.पं.निवडणूक मतदान, मतमोजणीसाठी आठवडे बाजार बंद
## नंदुरबारचे जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांच्याकडून आदेश

**नंदुरबार, दि.२५, (प्रतिनिधी)- आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी मतदानाच्या दिवशी तसेच मतमोजणीच्या दिवशी संबंधित क्षेत्रांतील आठवडे बाजार व जत्रा बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी धनंजय गोगटे यांनी दिले आहेत.**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, या निवडणुकीत जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू असून, निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकतेने पार पडण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

सदर निवडणुकीअंतर्गत दि.२८ एप्रिल (मंगळवार) रोजी मतदान तर दि. २९ एप्रिल (बुधवार) रोजी मतमोजणी होणार आहे. या दिवशी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती राहण्याची शक्यता लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी यांनी दि मार्केट्स अँड फेअर्स ॲक्ट, १८६२ मधील तरतुदीनुसार हा निर्णय घेतला असल्याचे या आदेशात नमूद केले आहे. या आदेशानुसार, मतदानाच्या दिवशी संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात तसेच मतमोजणीच्या दिवशी तहसील मुख्यालय परिसरात भरविण्यात येणारे आठवडे बाजार, जत्रा व इतर गर्दीचे उपक्रम बंद ठेवण्यात येणार आहेत. यामुळे मतदान केंद्र परिसरात अनावश्यक गर्दी टाळून मतदारांना निर्भयपणे मतदान करता येईल, तसेच मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणताही व्यत्यय येणार नाही, असे श्री. गोगटे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, तालुका स्तरावर अक्कलकुवा, तळोदा, शहादा, नवापूर आणि अक्राणी या तालुक्यांतील विविध ग्रामपंचायतींमध्ये मतदान होणार असून, त्या अनुषंगाने संबंधित क्षेत्रांतील आठवडे बाजार बंद ठेवण्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. मतदान होणाऱ्या ग्रामपंचायती व प्रभागांची, मतमोजणी केंद्रांची माहिती नमूद करण्यात आली आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या दिवशी ज्या संबंधित क्षेत्रांतील आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यानुसार तालुकानिहाय बाजारांची यादी पुढीलप्रमाणे आहे. अक्कलकुवा तालुका- रामपूर, बोखाडी, भांग्रापाक्षी, मोरंबा, डाब, कोराई व वाण्याविहीर या ग्रामपंचायत क्षेत्रांतील बाजार बंद राहणार आहेत. तळोदा तालुका- बोरद, करडे व बोरद येथे आठवडे बाजार बंद ठेवण्यात येणार आहेत. शहादा (पान ८ वर)

### नवापूर येथे अवैध दारूचा साठा जप्त

नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- नवापूर तालुक्यात अवैध दारू साठा व वाहतूक करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ९२ लाख ७८,४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नवापूर परिसरात सापळा रचला. संशयित वाहनांची तपासणी केली असता एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध दारू साठा आढळून आला. त्यानुसार तात्काळ छापा टाकण्यात आला.या कारवाईत आरोपीकडून विविध प्रकारची देशी-विदेशी दारू तसेच वाहतुकीसाठी वापरलेली ४ वाहने जप्त करण्यात आली. जप्त करण्यात (पान ८ वर)



**जांभुळ ज्युस मिळेल**
नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
**संकेत नित्या फार्म**
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६




# राष्ट्रीय शालेय स्पर्धेत शिरपूरच्या प्रजिता कंखरेला कांस्यपदक

**धुळे, दि.२५- सॉफ्टबॉल असोसिएशन धुळे जिल्ह्याची शिरपूर तालुक्यातील उदयोन्मुख खेळाडू कुमारी प्रजिता कैलास कंखरे हिची शालेय शासकीय १४ वर्ष खालील मुलींच्या राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड झाली होती त्यात दिल्ली येथे होणाऱ्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत कांस्यपदक पटकविले.**

धुळे येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत प्रजिता ने उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन करीत राष्ट्रीय निवड चाचणी साठी राजस्थान मधील जोधपूर येथे जानेवारी महिन्यात झालेल्या निवडचाचणीत विविध राज्यातून असंख्य खेळाडू सहभागी झाले होते. त्यातून दिल्ली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी तिची उल्लेखनिय कामगीर पाहता निवड करण्यात आली होती. ६९ व्या शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा दिनांक १५ ते २२ एप्रिल २०२६ दिल्ली येथे कुमारी प्रजिता कैलास कंखरे स्पर्धेत धुळे जिल्हयातून निवड झालेली एकमेव खेळाडू आहे. साखळी स्पर्धेत गुजरात, पंजाब, तामिळनाडू यांचा पराभव करत बाद पध्दतीत जम्मु काश्मिर संघाचा पराभव करता उपउपात्य फेरीत आध्र प्रदेश सोबत विजय मिळवित उपांत्य फेरीत दिल्ली सोबत पराभवाचा सामना करावा लागला त्यात तृतीय क्रमांक साठी मध्यप्रदेश सोबत विजय मिळवित राष्ट्रीय स्पर्धे चे कांस्यपदक प्राप्त केले.

कुमारी प्रजिता कैलास कंखरे ही ८ वी इयत्तेत शिकत असून ती धुळे जिल्हयाची पदक प्राप्त पहिली खेळाडू ठरली आहे. तिच्या या यशामुळे जिल्हयातील क्रीडा क्षेत्रातील गौरव वाढला आहे तीच्या या उल्लेखनिय यशाबद्दल सॉफ्टबॉल असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष गिरीष महाजन, सरचिटणीस प्रदिप तळवेलकर, राष्ट्रीय प्रशिक्षक किशोर चौधरी तसेच सॉफ्टबॉल असोसिएशनचे धुळे जिल्हा अध्यक्ष जयकुमार रावल, उपाध्यक्ष सतिष महाले, कार्याध्यक्ष राहुल रंधे, मनोज धनगर, जिल्हा क्रीडा अधिकारी एम.के.पाटील, रेखा पाटील, योगेश देवरे, शुभाप पावरा, प्राध्यापक प्रताळे, निंबाजी राठोड, ठाकूरसर, अमोल अहिरे, प्रयिंका सुलाखे, अशोक महाजन, ॲड. श्याम पाटील, विशाल पवार तसेच धुळे जिल्हाभरातून विविध स्तरावरून कर्मचारी क्रीडा प्रशिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

# आकांक्षित तालुका कार्यक्रम; नंदुरबारचे सर्व तालुके सर्वांगीण विकास, विविध क्षेत्रांत प्रगतीचा नवा रोडमॅप

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- राज्याच्या संतुलित व सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या आकांक्षित जिल्हा व आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला असून, या निर्णयामुळे नंदुरबार जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. आधीपासूनच आकांक्षित जिल्हा म्हणून समाविष्ट असलेल्या नंदुरबारमध्ये आता जिल्ह्यातील सर्व सहा तालुक्यांचा समावेश करून आरोग्य, शिक्षण, कृषी, कौशल्य विकास, आर्थिक समावेशन आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये अधिक वेगाने आणि परिणामकारक प्रगती साधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील दुर्बल व वंचित घटकांच्या जीवनमानात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यास मोठी चालना मिळणार आहे.**

नीती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली देशातील मागासलेल्या जिल्ह्यांचा झपाट्याने विकास करण्यासाठी जानेवारी २०१८ पासून आकांक्षित जिल्हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत नंदुरबार जिल्ह्याचा समावेश असून, आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषी व जलसंपदा, कौशल्य विकास व आर्थिक समावेशन आणि मूलभूत पायाभूत सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांतील ४९ कार्यक्षम निर्देशांकांच्या आधारे जिल्ह्याच्या कामगिरीचे सातत्याने मूल्यमापन केले जाते. या प्रक्रियेमुळे प्रशासनातील पारदर्शकता, स्पर्धात्मकता आणि कार्यक्षमता वाढीस लागली असून, स्थानिक विकासाला अधिक चालना मिळत आहे.

दरम्यान, पंतप्रधानांनी ७ जानेवारी २०२३ रोजी आकांक्षित तालुका कार्यक्रमाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यातील तालुक्यांच्या विकासासाठी स्वतंत्र मोजमाप प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी, नंदुरबार, अक्कलकुवा, तळोदा, शहादा आणि नवापूर हे सर्व सहा तालुके आकांक्षित तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या तालुक्यांमध्ये आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषी व संलग्न सेवा, सामाजिक विकास आणि मूलभूत पायाभूत सुविधा या पाच क्षेत्रांतील ४० प्रमुख निर्देशांकांच्या आधारे कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना नीती आयोगामार्फत विशेष प्रोत्साहन निधी ( ) देण्यात येणार असून, यामुळे स्थानिक प्रशासनाला अधिक प्रेरणा मिळणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या कार्यक्रमाच्या विस्तारास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयानुसार राज्यातील एकूण १० जिल्हे आकांक्षित जिल्हे म्हणून निश्चित करण्यात आले असून, १७७ तालुक्यांचा आकांक्षित तालुका कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे. या सर्व जिल्हे व तालुक्यांमध्ये राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना तसेच केंद्र पुरस्कृत योजना प्राधान्याने आणि समन्वयाने राबविण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे नंदुरबार जिल्ह्यातील विकास प्रक्रियेला अधिक वेग मिळणार असून, ग्रामीण व आदिवासी भागातील मूलभूत सुविधा बळकट करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. आरोग्य सेवा सुदृढ करणे, शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे, कृषी उत्पादनक्षमतेत वाढ करणे, रोजगार व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करणे आणि पायाभूत सुविधा सुधारणा यांसारख्या विविध अंगांनी जिल्ह्याचा विकास साधण्याचा व्यापक प्रयत्न या कार्यक्रमातून होणार आहे.

# विवेकानंद केंद्रातर्फे व्यक्तिमत्त्व विकास शिबिर

धुळे- आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. नवनवीन तंत्रज्ञान, बदलते सामाजिक जीवन, गतिमान जीवनशैलीमुळे पालक-पाल्यांमधे कमी झालेला संवाद यामुळे मुलांच्या संस्कारारवर परिणाम होत आहेत. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्याचे साहस मुला-मुलींमधे यावे याकरिता विवेकानंद केंद्र कन्याकुमार, शाखा धुळेतर्फे शनिवार दि.२५ ते २७ एप्रिल या कालावधीत इंदिरा गार्डन, जयहिंद कॉलनी, देवपूर धुळे येथे सकाळी ७:३० ते १०:०० यावेळात १२ वर्षापासून पुढे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अनिवासीय तीन दिवसीय व्यक्तिमत्त्व विकास शिबिर आयोजित केले आहे.




# जागतिक हिवताप दिनानिमित्त मनपामार्फत जनजागृती रॅली

**धुळे, दि.२५- धुळे महानगरपालिकेमार्फत जागतिक हिवताप दिवस असल्याने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.**

महापौर सौ.मायादेवी परदेशी यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवून महानगरपालिका नूतन इमारतीपासून रॅलीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपमहापौर सौ.जोत्स्ना पाटील, महिला बालकल्याण सभापती श्रीमती उज्वला ठाकरे, जिल्हा हिवताप अधिकारी अनिल पाटील, आरोग्य अधिकारी डॉ.संपदा कुलकर्णी व मलेरिया पर्यवेक्षक लक्ष्मण पाटील व मलेरिया विभागातील कर्मचारी उपस्थित होते. सदर रॅली मनपा प्रवेशद्वारापासून टॉवर गार्डन ते शहर पोलीस चौकी आग्रा रोड गोपाल टी पासून जुनी मनपा इमारत कडून नवीन मनपा इमारत येथे समारोप करण्यात आला. हिवताप आजाराबद्दल ध्वनिक्षेपकाद्वारे मार्गात जनजागृती करण्यात आली. समारोपप्रसंगी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देऊन अनिल पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. या रॅलीत मलेरिया पर्यवेक्षक मलेरिया सुपरवायझर, फिल्ड वर्कर, आरोग्य कर्मचारी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नर्सिंग स्टाफ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर द्या बीजेएसचा करिअर उपक्रमात प्रा.बाफनांचे प्रतिपादन

**शिंदखेडा, दि.२५- विद्यार्थ्यांनी कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर द्यावा असे मत प्रसिद्ध करिअर कॉन्सलर प्रा. मनोज बाफना (शहादा) यांनी व्यक्त केले. ते भारतीय जैन संघटनेने शिंदखेडा व नरडाणा येथे आयोजित केलेल्या करिअर कंपास कार्यक्रमात बोलत होते.**




जनता विद्यालय शिंदखेडा येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शाम पाटील तर नरडाणा येथील विकास विद्यालयाच्या कार्यक्रमात संस्थेचे चेअरमन सत्यजित सिसोदे अध्यक्षस्थानी होते. दोन्ही ठिकाणी प्रास्ताविकात प्रा.चंद्रकांत डागा यांनी, संघटनेने १२ महिन्याचे १४ फाउंडेशन कार्यक्रम दिले आहे, त्यापैकी करिअर कंपास हा १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार,क्षमतेनुसार करिअर साठी पर्याय निवडता यावा यासाठीचा हा कार्यक्रम असून संघटनेने चालविलेले, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार,परिणय पथ,एमएसएमई (सक्षम),कपल एम्पॉवरमेट, स्मार्ट गर्ल, पारिवारिक अदालत आदि कार्यक्रमांची माहिती दिली.

प्रा.मनोज बाफना म्हणाले, सध्याच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यातून निट व जे डबल ई परीक्षेचे भूत काढायला हवे. भारतात २५ लाख विद्यार्थी निटची परीक्षा देतात त्यापैकी केवळ १ लाख १६ हजार विद्यार्थ्यांना संधी मिळते.उर्वरित विद्यार्थ्यांचे काय? तसेच एमपीएससी, युपीएससी या स्पर्धात्मक परीक्षेच्या मागे न लागता १०वी,१२वी नंतर स्टाफ सिलेक्सशन या केंद्र सरकारच्या परीक्षेला विद्यार्थ्यांनी सामोरे गेले पाहिजे. कौशल्यावर आधारित शिक्षण घेऊन आपण नोकरी देणारे बनले पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी लोक काय म्हणतील, मला हे जमणार नाही, माझी ईच्छाच नाही,माझं नशीब खराब, माझ्याकडे वेळच नाही ये पाच गोष्टी डोक्यातून काढून टाकल्या पाहिजे.

एस.ए.पाटील यांनी सूत्र संचालन केले. विभाग अध्यक्ष प्रा. डागा, मुख्याध्यापक शाम पाटील, महासचिव अशोक राखेचा, शहर अध्यक्ष मयूर ओस्तवाल, पर्यवेक्षक बी. जे. पाटिल, जतिन बोरसे, डी. एस.सोनवणे, बी एच पाटील, एस एस भदाणे आदी उपस्थित होते. नरडाणा जैन संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रीतेश जैन, विभाग सचिव प्रकाश खिच्चा सहीत विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक, आर्थिक क्षेत्राला बळ; महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**धुळे, दि.२५- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसाठी मरिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयरफ तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल मक्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डफ्ने गौरविण्यात आले.**

भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात शुक्रवारी (२४ एप्रिल) महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार




सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. हरित ऊर्जेला प्राधान्य मिळाल्याने शेतकऱ्यांना दिवसा व स्वस्त वीज उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. तर वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरुवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला मक्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डफ्ने गौरविण्यात आले. तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक ९ लाख १७ हजार सौर पंप कार्यान्वित केले आहे. देशात सर्वाधिक ६४ टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ५ लाख ५ हजार (३४ टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहेत. या योजनेतून केवळ ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप कार्यान्वित करण्याच्या गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे ४२ लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरू झाला आहे. त्याची दखल घेत या योजनेसाठी महावितरणला मरिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयरफ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक नंदुरबार जिल्ह्यात आज मतदान

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२६ साठी येत्या २६ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नोंदणीकृत ५९१ वैद्यकीय व्यावसायिकांसाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली असून, बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक-२०२६ प्रमोद भामरे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या एकूण ०९ सदस्य पदांसाठी ही निवडणूक होत असून, त्यासाठी राज्यभरातून ६० उमेदवार रिंगणात आहेत. रविवारी सकाळी ०८-०० वाजल्यापासून सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत मतदारांना आपला हक्क बजावता येईल. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी मतपेट्या मुंबई येथील हाफकीन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्थेत जमा केल्या जाणार आहेत.

**नंदुरबारमधील मतदान केंद्र**

जिल्ह्यातील मतदारांसाठी बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक कार्यालयातील खोली क्रमांक ०४ मध्ये मतदान केंद्र तयार करण्यात आले आहे. ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा समन्वय अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी आणि मतदान केंद्राध्यक्षांची नेमणूक करण्यात आली असून त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.ज्या डॉक्टरांची नावे मतदार यादीत आहेत, त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदान करावे लागेल.



# मास्टर्स गेम्स चॅम्पियनशिप स्पर्धेत मोरे यांना सुवर्णपदक


धुळे, दि.२५- थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या जागतिक मास्टर्स गेम्स चॅम्पियनशिप या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत धुळे तालुक्यातील निमगुळ येथील रहिवासी व भारतीय सेना जिल्ह्यातील सेवानिवृत्त मानद लेफ्टनंट साहेबराव अंबर मोरे यांनी दोन सुवर्णपदक पटकावली, त्यांनी स्विमिंग या क्रीडा प्रकारात ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक आणि ५० मीटर फ्रीस्टाइल या दोन्ही प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत त्यांनी भारत देशाचा मान उंचावला. या स्पर्धेत भारतासह थायलंड, बांगलादेश इतर देशातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत साहेबराव मोरे यांनी नियमित सराव, अत्यंत मेहनत व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरावर त्यांचे अभिनंदन होत आहे.

प्रकाश में आज शिकार




धर्मेंद्र, आशापारेख, संजीवकुमार, हेलन, जॉनी वॉकर

## शब्दकोडे क्रमांक : २३५०



**आडवे शब्द :** १. अचानक जुळून आलेला भेटीचा योग ५. उत्तर ८. लाट १०. वयोमानानुसार पाडलेला गट ११. सप्तसुरांची धून १३.'-- साया' एक जुना हिंदी सिनेमा १५. मनाचा ओढा १६. पवन १७. विमानाची धावपट्टी १९. कट २१. जम २२. काकडी २४. सांभाळ २५. सोने २६. उजळणी २८. नृत्य २९. माधव ३३. प्रियकर ३५. कयास ३६. उत्साह ३७. अशोक कुमार यांना हिंदी सिने जगत ओळखते ते टोपणनाव ३८. तुलना ३९. घबरट नसलेला ४२. बाण ४३.भारताची एक बहुचर्चित अंतराळ मोहीम ४५. धनुष्य ४६. युद्ध ४७. चांगला **उभे शब्द :** २. गावठी ३.एक प्रसिद्ध रॅप स्टार **हनी सिंग ४. आकाश ६. वावर ७. तेजी ८. अंधार ९. केसांत माळायची एक पुष्पमाला १२. पंजाबी बोलीत-चूक १३. मेरठ-उलट लिहा १४.विचार १६. वर्तन १८. पगार १९. निवाळा २०. पालनपोषण करणारे २१. बारा वर्षाचा काळ २३. सिंह २४. प्रजा २५. एक पारदर्शक वस्तू २६.बनाव २७. रक्त २८. स्त्री ३०. गर्द ३१. वाद्य वाजवणारा ३२. माहेर-विरुद्ध ३३. वसा-उलट लिहा ३४.सागर ३६. शिष्य ३८. एका सरळ रेषेत नसलेला ३९. मनास दिलेला आधार ४०. विकसित ४१. प्रयत्न ४२. दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ४२. सोबत ४४.आदराने वाकलेला

**शब्दकोडे क्रमांक : २३४९ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | वा | ह | न | | हा | व | रा | | चिं | त | न |
| रा | | नी | | जा | त | | य | ल | गा | र | |
| म | घा | | रा | वा | | दा | ता | | री | | दा |
| | या | रा | | ई | मा | न | | चा | | था | ट |
| ब | ळ | क | ट | | घ | | ना | य | गा | रा | |
| दा | | ट | | वा | | थे | ट | | ठ | | ते |
| म | नी | | वा | च | न | | क | ट | | खा | रा |
| | ट | क | म | क | | क | | प | री | ट | |
| ता | | रा | न | | प | लं | ग | | ळ | | चि |
| श | र | म | | स | | क | | मा | | ना | व |
| | सा | त | वा | ह | न | | चा | ल | क | | ट |
| चा | ळ | | ळा | | भ | र | | क | द | र | |






आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर





प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

# शौर्याचे प्रतिक वाघनखे

जगप्रसिद्धवाघनखे या शस्त्राच्या निर्मितीचे जनक छत्रपती शिवाजी महाराज होत. हे सर्वात लहान परंतु अत्यंत प्रभावी शस्त्र होय. शस्त्रास्त्रांची निर्मिती ही मानवाच्या विचारशील कृतीचे प्रतिक होय. स्वसंरक्षणासाठी मानवाने विविध आयुधे तयार केली. व आपले संरक्षण केले. मानवाच्या सुरक्षिततेसाठी शस्त्र हे महत्वाचे साधन मानले. छत्रपतींनी शत्रूचा पराभव करण्यासाठी नेहमीच प्रगतशील शस्त्रे वापरून विजय मिळवले. स्वराज्यामध्ये वेग-वेगळ्या धाटणीची हत्यारे तयार केली व ती युद्ध-मोहिमांमध्ये श्रेष्ठ ठरली. त्यातीलच महत्वाचे शस्त्र म्हणजे वाघनखे होय.

स्वराज्यातील अठरा कारखान्यामध्ये जीरातेखाना म्हणजे शस्त्रागार हा महत्वपूर्ण विभाग होता. रायगड, राजगड, पुरंदर या किल्ल्यावरती शस्त्रास्त्रे तयार करण्याबरोबर तोफा बनविण्याचे कारखाने होते. छत्रपतींनी जी शस्त्रे वापरली ती विशिष्ट प्रकारची होती. त्यामध्ये तोफा व बंदुका यासारखी आधुनिक शस्त्रास्त्रे उपयोगात आणली. श्री.मा. कुलकर्णी संपादित अज्ञापत्रामध्येशास्त्रांची पुढील नांवे दिलेली आहेत. त्यामध्ये तलवार, कट्यार, भाले, मांडू, वाघनखे,




बरची, गोफण, धनुष्यबाण, ढाली, बंदुका, तोफा, बख्तरे, पट्टे, चिलखत, शिरस्त्राण, पाखरा, ताज, हुके, दारुगोळा, दगड टाकणारी यंत्रे , त्याच बरोबर तलवारीच्या विविध प्रकारच्या मुठींचीनांवे दिलेली आहेत. जून रोजी छत्रपतींच्या राज्याभिषेक प्रसंगी ढाल, तलवार व धनुष्यबाण या शस्त्रांचे शास्त्रोक्त पूजन झाले. छत्रपती ज्यावेळेस सिंहासनावर विराजमान झाले, त्यावेळी स्वराज्यातील किल्लूया - किल्लूयावरतोफांची धुमधडाक्याने सलामी देण्यात आली. छत्रपतींनी स्वराज्यात वैशिष्ट्यपूर्ण अशी शस्त्रे बनविली.त्यामध्ये दांडपट्टा,वाघनखे, विटा या शस्त्रास्त्रांचा समावेश होतो.स्वराज्यात इंग्रज, फ्रेंच,पोर्तुगिज या परकियांच्या तोडीची शस्त्रे तयार केली. कोणत्याही बाबतीत आपण परकीयांवर अवलंबून राहावयाचे नाही. हे ठरवून छत्रपतींनी प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे व वीरतेचे प्रतिक म्हणजे वाघनखे होय. हे शस्त्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडामध्येखूपच प्रभावी ठरले. स्वराज्यातील शस्त्र संग्रहालयामध्ये याला खूप महत्व होते. वाघनखे हे खऱ्या अर्थाने एक गुप्त म्हणजेच छुपे शस्त्र आहे. आपल्या हातामध्ये गुप्तपणे ठेवता येणारे आणि हातांच्या पंजात लपवता येणारे हे शस्त्रछत्रपतींच्या कालखंडामध्ये फारच लोकप्रिय झाले. मानवी शरीर रचना, सृष्टी, निरीक्षणव प्राण्यांचे युद्धतंत्र यांचे निरीक्षण करून या शस्त्राची निर्मिती झाली. वाघाच्या पंजाच्या नखांची रचना पाहून हे शस्त्र पोलादापासून निर्माण केले गेले. वाघ भक्ष्य पकडण्यासाठी, सावज जखमी करण्यासाठी, झाडावर चढण्यासाठी नखे बाहेर काढतो. त्यामुळे त्या पंजाचे एक घातक शस्त्र होते.तसेच पोलाद निर्मित वाघनखे शत्रूवर वार करतानाच बाहेर यावे म्हणून त्याला अंगठ्याद्वारे हाताच्या पंजात लपवून ठेवले. शत्रूला बेसावध ठेवून मारण्याची युक्ती म्हणजे वाघनखे होय.

स्वराज्यातील ही वाघनखे पोलादाची बनविलेली असून, ती अत्यंत तीक्ष्ण असत. वाघनखे तयार करण्याचे विशिष्ठ असे तंत्र होते. त्यानुसारच हे शस्त्र तयार केले जात असे. एका पोलादी पट्टीवर अर्धवर्तळाकार वाघाच्या नख्यांसारखी पाती बसवून पट्टीवर दोन अंगठीच्या आकाराच्या कड्या बसवितात.ही पोलादी पाती दोन,चार व पाच नख्या असणारी पहावयास मिळतात. वाघनखे हे शस्त्र खरा-खरच वाघांच्या नखापासून बनविलेले शस्त्र वाटतेपरंतु तसे नसून, त्याची रचना ही वाघाच्या नखाप्रमाणे वक्र व टोकदार ठेवून वरून अंगठीसारख्या दिसणाऱ्या कड्या सामान्यतः पोलादी, सोन्याच्या, चांदीच्या अथवा पोलादी कड्यावर सोन्याचा मुलामा दिलेल्या अशा असत. म्हणजे वाघनखे परिधान केल्यानंतर वरून अंगठीसारखी रचना दिसणारी व हाताच्या पंजामध्ये छुप्या पद्धतीने आत बसणारी वाघनखे हात उघडताच आपला गुण दाखविण्यास तयार असतात. वाघनख्यांचा मारा शक्यतो बरगड्याच्या खालील मांसल भागात, कंठावर, मानेच्या छातीकडील भागावर केला जात असे. शत्रूला जायबंदी करणे, शत्रूचे खच्चीकरण करणे, शत्रूस चलबिचल करणे हा त्याचा मुख्य उद्देश असला तरी वाघनख्याच्याचिमटीत मांसल भाग आला तर समोरील शत्रूच्या हातात कितीही मोठ शस्त्र असले तरीही तो असह्यहोतो हे निश्चित. प्रामुख्याने वाघनखे उगारावयाची नसतात. ती पोटात हात दाबून खुपसायची असतात. वाघनख्याच्या वाकड्या टोकामुळे ती पोटात आणि फक्त पोटातच अडकतात. वेदनेने माणूस स्वतःला संपवून घेतो. हे शस्त्र गुप्त होते, वापरायला सोपे होतेआणि तात्काळ काम करणारे होते. छत्रपतींच्या लष्करात वाघनखे या शस्त्राला वेगळे असे स्थान होते. या शस्त्राचा वापर फक्त शत्रूला मारण्यासाठी नव्हता तर युद्ध प्रसंगी उंच डोंगर कडे चढताना, खोचनीत हाताची पकड घट्ट करण्यासाठी, झाडावर चढता यावे म्हणून व युद्ध प्रसंगी छुपे शस्त्र म्हणून बहुगुणी असा केला जात असे.

हे एक विलक्षण व असाधारण असे शस्त्र आहे. वाघनख्याच्या हल्लूयात शत्रू मानसिक दृष्ट्या खचून जातो. ते पोटात खोलवर खुपसले तर तगडा माणूस सुद्धा घायाळ होऊन संपतो.छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यावर चाल करून आलेला विजा-पूरचा सरदार अफजलखान यांच्या भेटीच्या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांनी वाघनख्यांच्या सहाय्याने अफजलखानाचाकोथळा बाहेर काढला.छत्रपतींच्या या पराक्रमामुळे स्वराज्यातील एक मोठे संकट दूर झाले. गुरुवार दि. नोव्हेंबररोजीच्याप्रतापगडाच्या युद्धामध्ये हे शस्त्र वापरल्यामुळेया शस्त्राला शस्त्रगारामध्ये फार महत्व मिळाले व इतिहासात ते अमर झाले. प्रतापगडाच्या लढाईचे वर्णन करताना परकीय लेखक मनुची असे होते मुघल या ग्रंथात लिहितो. छत्रपती शिवाजी महाराजांनी कड्याच्या आकाराचे पण तळ हातात लपविता येईल अस एक शस्त्र धारण केले होते. (पान नं.४ वर)

# दार उघड बये दार उघड...!

लँड जि!हाद, लव जि!हाद, जिम जि!हाद,कॉर्पोरेट जि!हाद...ही यादी वाढतच आहे. या घटना आणि त्यांचे परिणाम, तरुणींचं शोषण सातत्याने समोर येत आहे. समाज माध्यमांवरचे, व्हिडीओ, बातम्या, सखोल लेखन, चित्रपट, विविध सामाजिक संस्थांद्वारे जनजागृती...एवढंच काय पण पोलिसांकडून मिळणारी माहिती आणि सतर्कतेचा इशारा.... चोहीकडून या विषयावर लख्ख प्रकाश टाकला जात आहे. एकूणच त्यांची सतत बदलणारी modus operandi (कामाची पद्धत) आपल्याला वारंवार सावध करत आहे. पण तरीही समाजातल्या तरुणी मनाची कवाडं का बंद करून बसल्या आहेत? ज्या निरपराध आहेत, त्यांचा इथे विषय नाही. परंतु ज्या हे सारं टाळू शकतात त्यांना मात्र परखड प्रश्न विचारणं तितकंच महत्त्वाचं आहे.

औद्योगिक संस्था, दुष्कृत्य करण्यासाठी रूम पुरवणारी हॉटेल्स...अशा सगळ्यांना तेवढंच जवाबदार (accountable) ठरवणं, धर्मांतरविरोधी कडक कायदे आणि त्याची अंमलबजावणी, जनजागृती,पोलीस कारवाई याद्वारे उपाय सुरू आहेतच. पण माझा सवाल आहे तो स्वतः victim mode मध्ये वावरणाऱ्या तरुणी आणि स्त्रियांबद्दल.

**...कशासाठी?**

बाई गं, अशी कोणती अगतिकता आहे की जी बुद्धीला झापडं लाऊन चुकीच्या माणसांवर अंधविश्वास ठेवायला भाग पाडत आहे? वैयक्तिक आयुष्यात अशी कोणती जगावेगळी दु:खं आहेत ज्यामुळे सतत तुम्ही victim होऊन आधारासाठी खांदा शोधत आहात? अशी कोणती हतबलता आहे की ज्यामुळे आत्मसन्मान विकून तुम्हाला नोकरी आणि प्रमोशन हवं आहे? कुटुंबव्यवस्था,संस्कार,चांगली संगत हे सारं क्षणांत डावलून मुक्त होण्यामध्ये तरुणींना कसली धन्यता वाटत आहे? रोज नवनवीन डावपेचांना, निरनिराळ्या पद्धतीने केलेल्या बुद्धीभेदांना बळी पडतांना तुमचं शिक्षण, तुमचा विवेक, स्वाभिमान कुठे गहाण ठेवताय? पदोपदी लावलेले सापळे आपण ओळखायला पाहिजेत,त्यापासून चातुर्याने दूर रहायला पाहिजे असं अजूनही वाटत नाही का? हे परखड प्रश्न सर्वांना लवकरात लवकर जागं करोत.

ज्याप्रमाणे गरीब परिस्थिती, शिक्षणाचा अभाव वगैरे गोष्टी समाजात दहशतवादी तयार करतात,मुळात ती निरागस माणसंच असतात हा मूर्ख समज आता दूर झालाय आणि त्याच्या मुळाशी असणारी टोकाची धर्मांध वृत्ती कुणीही नाकारू शकत नाही, त्याचप्रमाणे ओळख लपवून करण्यात येणारी कारस्थानं,मुलींचं शोषण,धर्मांतर,पाठोपाठ क्रूर हिंसा असा घटनाक्रम लवजि!हादचा हेतू स्पष्ट करतो आणि या घटनांना व्यक्तीस्वातंत्र्य किंवा आंतरधर्मीय विवाह इ. कायदेशीर गोष्टींपासून वेगळा करतो (अजूनही काही ढोंगी लोक या घटनांना सामान्य म्हणून गृहीत धरत आहेत ही गोष्ट वेगळी). कोणते मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत?

**सशक्त प्रतिमा**



काही ना काही वैयक्तिक अडचणींमध्ये ग्रासलेल्या तरुणी शोषणाला लवकर बळी पडत आहेत. असं का? संस्कृतात एक सुंदर सुभाषित आहे. ज्या लाकडामध्ये आग/ ठिणग्या स्पष्ट दिसतात ते ओलांडण्यासाठी सहसा कुणी धजावत नाही, पण जिथे ती प्रकर्षाने दिसत नाही, आतल्या भागात असते, ते लाकूड कुणीही सहज ओलांडण्याचं धाडस दाखवतं. तशीच व्यक्तीची प्रतिमा आयुष्यात खूप महत्त्वाची आहे. प्रत्येक मुलीची प्रतिमा करारी का असू नये? प्रयतक्पूर्वक तिने ती तशी घडवावी. स्वतःचं आत्मबळ वाढवावं. महाविद्यालय असो, ऑफिस असो,व्यवसाय असो समर्थ,सशक्त व्यक्तिमत्त्व आपोआपच संकटांना दूर ठेवतं. याउलट स्वतःच्या अपयशासाठी कायम परिस्थितीला दोष देणं, कुटुंबातले वाद बाहेर सांगणं, स्वतःला दुर्बल, हतबल समजून प्रत्येक वळणावर परिस्थितीचं उदात्तीकरण करणं थांबवायला हवं.त्यातूनच शोषणासाठी मुली हेरल्या जातात. समोरचा तुमच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन स्वतःचा खांदा पुढे करतो. तुम्ही त्याचं स्वागतच करता!

मेजर मोहिनी गर्गे कुलकर्णी
निवृत्त

**माझी सुरक्षा माझी जवाबदारी**

my life – my space म्हणता तसंच स्वतःच्या सुरक्षेची किती जवाबदारी घेता? सामाजिक स्तरावर हा विषय महत्त्वाचा आहेच परंतु एकूणच स्वतःच्या सुरक्षेसाठी जाणतेपणाने आम्ही काय काय करतो? किती सतर्क आहोत? खूप उदाहरणं आहेत. तपासून बघा पालक म्हणून शाळा, ट्यूशन किंवा इतर आवश्यक whats app groups व्यतिरिक्त आपण किती whats app groups चा भाग आहोत? ब्युटिपार्लर, रेसिपीज, साड्या आणि दागिने खरेदी, गृह सजावट, tattoos, छंद,सौंदर्य प्रसाधनं, इतर business groups ,प्रॉपर्टी खरेदी विक्री,ट्रेडिंग अशा वेगवेगळ्या कारणांमुळे एकेक स्त्री कित्तीतरी व्हाटस्अॅप ग्रुप मध्ये सध्या सहज अॅक्टिव्ह असते ही वस्तुस्थिती आहे! त्या ग्रुपमधल्या बाकी सदस्यांना तुम्ही ओळखता का? त्यातून तुमच्याविषयी महत्त्वाची माहिती, तुमच्या नकळत किती लोकांपर्यंत सहज पोहोचते याची कल्पना तुम्हाला आहे का?

कुणाकडून काही प्रॉडक्ट/सेवा घेतली की तो म्हणतो मी तुम्हाला व्हाटस्अॅप ग्रुप मध्ये अॅड करतो म्हणजे पुढचे प्रोडक्टस आले की तुम्हाला ग्रुपवर दिसतील...कशासाठी? नॉटिफिकेशन साठी सुद्धा नंबर देऊ नका. काम झालं की तो नंबर आपण कितीदा ब्लॉक करतो?

**आवश्यक तेवढंच बोला**

परवा एका किराणा दुकानात होम डिलीव्हरी साठी दुकानदाराला आलेला फोन स्पीकरवर टाकून तो विचारतो, दाल किलो कर दू? त्यावर बाई म्हणतात, नही, इतने बडे घर में हम दोनो ही रहते है...उसमें भी हसबंड ज्यादातर बाहरगाव जाते है.. ज्यादा समान का क्या करू? आप एक किलो लिखिए मी समोरच होते. एक किलो की दोन एवढंच बोला. इतर भाषण कशाला करता! होम डिलीव्हरी मुळे सुलभता वाटते, पण धोकाही तेवढाच वाढत आहे, लक्षात घ्या.

**रक्षक की भक्षक? कसं ओळखायचं?**

डिलीव्हरी बॉय व्यवस्थित इन्ट्री करून येत आहेत का? येणारे नक्की त्याच फ्लॅटच्या पत्त्यावर जात आहेत का? काम झालं की लगेच बाहेर पडत आहेत की तिथेच घुटमळत इतर माहिती काढत आहेत? ज्या security एजन्सीकडे सोसायटीच्या सुरक्षेची जवाबदारी/कॉंट्रॅक्ट आहे...ती एजन्सी सहसा कसे गार्ड्स पुरवत आहे? हेही बघायला हवं. काहीही संशयास्पद आढळल्यास त्यांच्याकडून तत्काळ काम काढून घ्यावं. दुरुस्तीसाठी सुतार,प्लंबर,इलेक्ट्रिशियन,गाडीसाठी ड्रायवर इत्यादि पुरवणाऱ्या एजन्सीने कोणाला पाठवलं आहे? संशयास्पद आढळल्यास घरात घेऊ नये/त्याच्या गाडीत जाऊ नये. काम करतांना अरेरावी केली तर रिमार्क नोंदवण्यासाठी विसरू नये.

**कम्फर्ट झोन**

मी सॉफ्टवेअर इंजीनियर आहे, मी मॅनेजमेंट क्षेत्रात काम करते... माझा इतर सामाजिक समस्यांशी काय संबंध? everything is politics yaar... मला दूर रहायचं आहे.. असं म्हणत अनेक सुशिक्षित स्त्रिया मतदानही करण्याची तसदी घेत नाहीत. अशा भिंती घालून घेणाऱ्या स्त्रिया सर्रास आढळतात भोवती. नोकरी, weekend life, शॉपिंग इ. चकोरीचा कम्फर्ट झोन कधी होतो त्यांचं त्यांनाही कळत नाही! ज्या राष्ट्राचे तुम्ही नागरिक आहात, ज्या समाजात तुम्ही रहाता, त्याविषयी एवढी उदासीनता कशासाठी? 'work-life balance' - वर सातत्याने चर्चा होताना दिसते, पण त्यातल्या life चा परीघ किती मोठा आहे, ते नको समजून घ्यायला? समाजकारण, धर्मकारण,अर्थकारण,राजकारण (पान नं.५ वर)

# महाराष्ट्रः संस्कृती, समृद्धी आणि स्वप्नांचा महाप्रदेश

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा

गोविंदग्रजांच्या या ओळींनी महाराष्ट्राच्या मातीतील जो पवित्रपणा अधोरेखित केला आहे, तोच आपल्या अस्तित्वाचा सुगंध आहे. येत्या १मे स उत्साहपूर्ण महाराष्ट्र दिन साजरा करणार आहोत, जेव्हा आपण भविष्याकडे पाहतो, तेव्हा जाणीव होते की महाराष्ट्र हे केवळ एक राज्य नसून ती एक विचारप्रणाली आहे. पराक्रमाची आणि ज्ञानाची शिदोरी महाराष्ट्राचा काल हा संघर्षाचा पण तितकाच स्वाभिमानाचा होता. सह्याद्रीच्या कडेकपारीतून घुमणारी शिवरायांची गर्जना आजही आपल्याला अन्यायविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते. पण हा महाराष्ट्र केवळ तलवारीचा नव्हता, तर तो लेखणीचा आणि तुळशीच्या माळांचाही होता. पैठणच्या संत एकनाथांनी मांडलेली समता असो किंवा चक्रधर स्वामींनी दिलेला अहिंसेचा संदेश, या सर्वांनी मिळून महाराष्ट्राची सांस्कृतिक वीण घट्ट विणली आहे. मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हा समर्थ रामदासांचा विचार केवळ राजकीय एकत्रीकरण नव्हता, तर तो वैचारिक एकसंधतेचा मंत्र होता.

**आधुनिकता आणि परंपरांचा संघर्ष**

आजचा महाराष्ट्र हा प्रगतीच्या शिखरावर आहे. मुंबईचे आर्थिक सामर्थ्य आणि पुण्याचे शैक्षणिक वैभव संपूर्ण जगाला भुरळ घालत आहे. परंतु, या झगमगाटात काही मूलभूत प्रश्न आजही उभे आहेत. आजची तरुण पिढी तंत्रज्ञानात प्रगत असली, तरी त्यांच्या मनात आपल्या मातीबद्दलची कृतज्ञता टिकवून ठेवणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या काळात माणूस हरवत चालला आहे की काय, अशी भीती वाटते. अशा वेळी ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि संस्कारांची शिदोरीच तरुण पिढीला दिशा देऊ शकते. शिक्षण म्हणजे केवळ माहिती भरणे नव्हे, तर चारित्र्य घडवणे होय. आजच्या महाराष्ट्राला अशाच चारित्र्यसंपन्न पिढीची गरज आहे, जी तंत्रज्ञानाचा वापर विध्वंसासाठी नाही तर विकासासाठी करेल. पुढील - वर्षांतील महाराष्ट्र कसा असावा, याचे स्वप्न पाहताना डोळ्यासमोर सुजलाम् सुफलाम् महाराष्ट्राचे चित्र येते.

आपला इतिहास केवळ कागदावर राहता कामा नये. दुर्मिळ ग्रंथ, जुनी हस्तलिखिते आणि ऐतिहासिक कागदपत्रे यांचे अत्याधुनिक पद्धतीने डिजिटायझेशन होणे ही काळाची गरज आहे. यामुळे आपला वारसा अजरामर होईल. उद्याचा शेतकरी हा केवळ कष्टकरी नसावा, तर तो मतंत्रज्ञफ असावा. गावे स्मार्ट व्हावीत, पण त्यांचा गावरान आत्मा हरवू नये.

मराठी पाऊल पडते पुढे असे म्हणताना, ती पावले साहित्याच्या क्षेत्रातही तितक्याच मजबुतीने पडायला हवीत. जागतिकीकरणात आपली मायबोली मागे पडू नये, यासाठी साहित्यिक चळवळी अधिक व्यापक होणे गरजेचे आहे.



कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी म्हंटल्याप्रमाणे- माझी माय सरस्वती, जशी दुधावरची साय. आपल्या साहित्याची ही गोडी पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

विकास कपोले

उद्याच्या महाराष्ट्रात : प्रत्येक गावात एक सुसज्ज मई-लायब्ररीफ असावी, जिथे जुने आणि नवे साहित्य एकाच वेळी उपलब्ध असेल. प्रगती करताना सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि कोकणचा निसर्ग यांची हानी होणार नाही, याची काळजी आपण मजागरूक नागरिकफ म्हणून घेतली पाहिजे. जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जन या उक्तीप्रमाणे ज्ञानाचे आदानप्रदान वाढावे. महाराष्ट्र हा केवळ भूभाग नाही, तर तो एक संस्कार आहे. कालच्या पराक्रमी इतिहासाकडून स्फूर्ती घेऊन, आजच्या आव्हानांवर मात करत, आपल्याला उद्याचा प्रगत आणि सुसंस्कृत महाराष्ट्र घडवायचा आहे.

***शेवटी कुसुमाग्रजांच्या शब्दांत सांगायचे तर:***
***कणाहीन पाठीवरती, हात तुझा तू ठेव.***
***लढ म्हणालात तरीही, पुरेसा आहे देव!***

आपल्याला हीच लढण्याची आणि घडवण्याची वृत्ती कायम ठेवायची आहे. महाराष्ट्र दिन साजरा झालेल्या मे च्या या मुहूर्तावर आपण असा संकल्प करूया की, आपला महाराष्ट्र हा केवळ देशातच नाही, तर जगात ज्ञानाच्या आणि माणुसकीच्या बाबतीत अव्वल स्थानी असेल.

***राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा...*** ही ओळ कानी पडली की, अंगावर रोमांच उभे राहतात. महाराष्ट्राची माती केवळ भूगोल नाही, तर तो एक जिवंत इतिहास आहे, एक धगधगते चैतन्य आहे. येत्या १ मे स महाराष्ट्र दिन आपण सर्वांनी मोठ्या उत्साहात साजरा करणार आहोत. या निमित्ताने महाराष्ट्र नावाच्या या महासंस्कृतीचा कालचा वारसा, आजची स्थिती आणि उद्याचे स्वप्न काय असावे याबाबत आपण सर्वांनी विचार करायला हवा. महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे संघर्षातून निर्माण झालेले स्वराज्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापन करून समता आणि न्यायाचा जो आदर्श घालून दिला, तोच आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने विश्वात्मक कल्याणाची मांडणी केली, तर संत तुकारामांच्या अभंगांनी सामान्य माणसाला विठ्ठलाच्या जवळ नेले. ***बहु असोत सुंदर संपन्न महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा*** या गीतातील ओळींप्रमाणे आपल्याकडे शौर्य आणि भक्तीचा सुंदर संगम होता. आजचा महाराष्ट्र हा आधुनिक भारताचे इंजिन मानला जातो. तंत्रज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात आपण आघाडीवर आहोत. पण या भौतिक प्रगतीसोबतच काही सांस्कृतिक आव्हानेही उभी राहिली आहेत. आपण डिजिटल युगात वावरत असताना जुन्या कौटुंबिक मूल्यांची जपणूक करणे हे मोठे आव्हान आहे. ज्येष्ठ नागरिक आणि तरुण पिढी यांच्यातील संवाद हा या प्रगतीचा कणा असायला हवा. ज्या देशात विद्वान आणि वृद्धांचा आदर होतो, तो देश कधीही अधोगतीला जात नाही. आज मराठी साहित्यात नवनवीन प्रयोग होत आहेत, परंतु वाचन संस्कृती टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. सोशल मीडियाच्या युगात भाषेची शुद्धता आणि गांभीर्य टिकवणे आवश्यक झाले आहे. पुढील महाराष्ट्राचे व्हिजन हे केवळ आर्थिक नसावे, तर ते वैचारिक असावे. येणारा काळ हा बुद्धिमत्तेचा आणि संवेदनशीलतेचा असेल. आपला ऐतिहासिक वारसा, दुर्मिळ हस्तलिखिते आणि ग्रंथसंपदा ही डिजिटल स्वरूपात जतन करणे (Digitization) हे उद्याच्या महाराष्ट्राचे महत्त्वाचे पाऊल असेल. यामुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीला महाराष्ट्राचा इतिहास एका क्लिकवर उपलब्ध होईल. उद्याचा तरुण हा केवळ पदवीधर नसावा, तर तो नैतिक मूल्यांनी संपन्न असावा. शहाणे करून सोडावे सकळ जन हा समर्थ रामदासांचा विचार आपल्याला पुढे न्यायचा आहे. गड-किल्लूयांचे जतन आणि निसर्गाचे संवर्धन हा विकासाचा अविभाज्य भाग असावा.

महाराष्ट्राचे वर्णन करताना कवी कुसुमाग्रज म्हणतात:

***माझ्या मराठीची गोडी, मला वाटते अवीट ।***

उद्याच्या महाराष्ट्रात ही मराठीची गोडी अधिक वाढायला हवी. जेव्हा आपण उद्याच्या महाराष्ट्राचा विचार करतो, तेव्हा आपल्याला केवळ सिमेंटची जंगले नकोत, तर माणसांच्या मनात माणुसकीची आणि साहित्याची मशब्दंगणफ फुलायला हवीत.

महाराष्ट्र दिन हा केवळ सण नसून तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. शिवरायांचे शौर्य, संतांची समता आणि विचारवंतांची प्रगल्भता या त्रिसूत्रीवर आधारित उद्याचा महाराष्ट्र हा जगासाठी मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

***जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!***



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# ध्येय किंवा अंतिम इच्छा

मनुष्याचे जीवन सुखी आणि यशस्वी होण्याकरिता त्याच्यासमोर एखादे ध्येय किंवा निश्चित अंतिम इच्छा असावी लागते.ध्येय शून्य जीवन निरस असते व ध्येय हीन मनुष्याच्या हातून कोणताही श्रेष्ठ पुरुषार्थ घडू शकत नाही म्हणून प्रत्येक व्यवहारी पुरुषांनी शक्य तितक्या लवकर आपले आयुष्यातले ध्येय निश्चित केले पाहिजे. मनुष्याच्या जन्माबरोबर त्याच्या अंगी विशिष्ट मानसिक शक्ती निर्माण झालेली असते. त्या शक्तीचा उपयोग करून विकार विचार आणि संकल्प इत्यादी मनोव्यापार करू शकतो. मनो व्यापार होत असता शक्तीचा व्यय होतो व ते बंद राहिले म्हणजे खर्च झालेली शक्ती भरून येऊन काही अंशी तिची वाढ होते. जे जे मनोव्यापार आपण नेहमी करीत जातो. ते ते करण्याची आपल्या मनाची शक्ती दिवसेंदिवस वाढत जाते आणि इतर अवयवांचीही शक्ती आणि कार्यक्षमता वाढते .एका व्यापाराचा परिणाम इतर मानसिक शक्ती वरही होतो. एका शक्तीची वाढ झाल्यास इतर शक्तीही थोड्या बहुत प्रमाणात वाढतात.

आपण एखादे निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्य करू लागलो की आपल्या सर्व मानसिक शक्तीची वाढ आश्चर्यकारक रीतीने होते. इच्छा दुबळी असली की क्रिया प्रवर्तक शक्ती दुबळी असते पण निश्चित ध्येय ठरल्याबरोबर मनाची सर्व शक्ती एकाच इच्छेवर केंद्रीत होऊन ती इच्छा तीव्र होते .त्यामुळे बुद्धीची एकाग्रता वाढते. स्मरणशक्ती वाढते, कल्पनाशक्ती वाढते, अंत प्रेरणा होऊ लागतात. आत्मबळ वाढते, आत्मविश्वास वाढतो ,काम करण्याचा उत्साह वाढतो थकवा येत नाही आणि अखेर आपले ध्येय गाठून यशस्वी झाल्याशिवाय सहसा राहत नाही.

आपण जे कार्य अंगीकृत केले ते पूर्ण होण्याकरिता ज्या अनेक गोष्टींची जरुरी असते त्यापैकी त्या कार्य संबंधाने मनात तीव्र इच्छा उत्पन्न होणे किंवा त्या कार्याची मनाला तीव्र तळमळ लागणे ही महत्त्वाची गोष्ट असते. ध्येय प्राप्तीचा प्रयतक करीत असता मनुष्याची मनोवृत्ती कशी असली पाहिजे याचा विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येकाला आपल्या स्वधर्म वेगळा वाटेल पण महत्त्वाची गोष्ट ही आहे की ध्येय किंवा स्वधर्म निश्चित झाला की त्याबद्दलची तळमळ मनाला इतकी लागली पाहिजे की वेळ प्रसंगी प्राणावर संकट आले तरीही स्वतःचे ध्येय किंवा स्वधर्म सोडण्याची इच्छा होता कामा नये.

याचे कारण असे की स्वधर्माचे पालन करताना काही अडचणी येणे शक्य आहे .त्यामुळे निराश होण्याची पाळी येते. अशावेळी स्वधर्मावरील निष्ठा नसेल तर मनुष्य त्याचा सहज त्याग करून दुसऱ्या इच्छेच्या मागे लागतो पण इच्छा कोणतिही असली तरी ती साध्य करताना पुन्हा पहिल्यासारखी परिस्थिती थोड्या प्रमाणात निर्माण होतेच .नुसती इच्छा कितीही चांगली असली तरी ते आपोआप कधीच सिद्धीस जात नाही. कोणतीहु इच्छा सिद्धीस जाण्याकरिता दीर्घ प्रयतक करावा लागतो. तात्पुरत्याअपयशाने खचून न जाता किंवा त्याला न जुमानता चिकाटीने कार्य चालू ठेवावे लागते. अनेक प्रकारचे कष्ट सहन करावे लागते. तेव्हाच शेवटी इच्छा सफल होते आणि यश पदरात पडते.

पण जो एकदा अडचणी अपमान अपयश दुःख इत्यादींना भिऊन स्वधर्म किंवा ध्येय सोडतो त्याचे मन एकदा कच खाल्ल्यामुळे काही अंशी दुर्बल होते. यश मिळवण्याकरिता लागणारा कणखर पणा त्यामध्ये राहत नाही. त्याची आराम इच्छा बळावते त्याचा आत्मविश्वास नाहीसा होतो आणि जरासा कठीण प्रसंग दिसल्या बरोबर नव्याइच्छेचाही त्याग करून तो पुन्हा कमी कष्टाने साध्य होणाऱ्या दुसऱ्याच इच्छेच्या मागे लागतो. ज्याप्रमाणे अडचणी अपयश किंवा दुःख यांना भीऊन एक इच्छा किंवा ध्येय सोडून दुसऱ्या मागे जाणारा मनुष्य आपल्या कार्यात केव्हा ही यशस्वी होऊ शकत नाही. तो दिवसेंदिवस अधोगतीला जातो. एकदा निश्चित केलेले ध्येय किंवा स्वधर्म विशेष महत्त्वाच्या कारणाशिवाय केवळ स्वार्थ दृष्टी सुखाची इच्छा गौरव इत्यादींच्या लोभाने किंवा तात्पुरती संकटे व अपयश यांच्या भीतीमुळे सोडणे मनुष्याच्या अंतीम हिताच्या दृष्टीने अनर्थकारक आहे.

एकदा ठरविलेले ध्येय दुसऱ्यांनी किती आग्रह केला तरी न सोडणाऱ्याला व्यवहारात काही वेळा हट्टी दुरा ग्रही इत्यादी नावे इतरांकडून ठेवण्यात येतात. पण दुसऱ्यांच्या म्हणण्याकडे लक्ष देऊन मनुष्य आपले ध्येय ठरवू लागला किंवा बदलू लागला तर त्याची अवस्था वाईट होते. स्वतंत्र बुद्धीने स्वतःचे ध्येय ठरवून स्वधर्म निधन श्रेय या वृत्तीने वागणारे पुरुषच उत्कर्षाच्या शिखरावर जाऊ शकतात. याचाच अर्थ हा आहे की माणसाने आपला स्वधर्म म्हणजेच कर्तव्य प्रथम निश्चित करावे काहीही झाले तरी ते पूर्ण करण्याचा प्रयतक करावा, इच्छांवर नियंत्रण ठेवून इतरांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयतक करावा. जेणेकरून आपली ध्येयासक्ती आपणास गाढण्यास मदत होईल आणि इच्छेचि आपणास सुखी जीवनाच्या वाटचालीसाठी मदतच होईल.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# कमाई

शाळेच्या सक्हेसंमेलनाची धामधूम सुरू होती. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमापेक्षा मुलांना कार्यक्रमासाठी येणाऱ्या प्रमुख पाहुण्यांची अधिक उत्सुकता होती. कोल्हापूरच्या नामांकित महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. शाळेतील सगळे शिक्षक आणि कार्यसमितीत काम करणारे सर्व विद्यार्थी आपापली जबाबदारी पार पाडण्यात दंग होते. नंदूने सूत्रसंचालनाची जबाबदारी घेतली होती. पाहुण्यांचे स्वागत विद्यार्थी प्रतिनिधी करणार होते. मात्र त्यात ऐनवेळी बदल करण्यात आला. स्वागताचा मान मुख्याध्यापकांना द्यावा, असे सर्वानुमते ठरले. स्वागतगीत आणि ईशस्तवनासाठी वाद्यवृंद तयार होते. दोन आठवडे त्याचा सराव चालू होता. शाळेचे सक्हेसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या आनंदाचे शिखर होते. पारितोषिके मिळवणारे विद्यार्थी तर या आनंदाच्या शिखरावर केव्हाच पोहचले होते. त्यांचा आनंद अधिक संस्मरणीय होण्यासाठी इतर कितीतरी गोष्टींची तजवीज शाळेने केली होती.

नियोजनाप्रमाणे सक्हेसंमेलनाचा दिवस उजाडला. शाळेच्या मध्यभागी असणाऱ्या मैदानात मंडप उभारला होता. एका बाजूला उंच व्यासपीठावर पाहुण्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थी सूचनेप्रमाणे रांगेत बसले होते. तेवढ्यात एक पांढरी कार शाळेच्या प्रवेशद्वारात येऊन थांबली. निळ्या रंगाची सफारी घातलेले, उंच, धिप्पाड शरीरयष्टीचे, डोक्यावर काळेभोर केस असलेले, डोळ्यांना सोनेरी कडांचा चष्मा लावलेले प्रमुख पाहुणे गाडीतून उतरले. सर्वप्रथम ते मुख्याध्यापकांच्या दालनात गेले. मंडपात गंभीर शांतता पसरली. सर्वजणांना आता प्रमुख पाहुण्यांची व्यासपीठावर येण्याची उत्सुकता होती.

अगदी काही मिनिटातच प्रमुख पाहुण्यांना घेऊन मुख्याध्यापक, पदाधिकारी व्यासपीठावर आले. प्रतिमापूजन झाले, ईशस्तवन झाले, स्वागतगीताने व पुष्पगुच्छांसोबत पुस्तक देऊन सर्वांचे स्वागत झाले. मग पाहुण्यांची ओळख करून देण्यात आली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाची व्यवस्था निर्माण करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील प्राचार्य आपल्या जीवनातील संघर्षाबाबत मनोगत व्यक्त करतील असे सूत्रसंचालक नंदूने निवेदन केले. संपूर्ण मंडपात शांतता पसरली. सगळेजण कान टवकारून ऐकू लागले.

आमच्या शाळेत मुलेच जेवण वाढतात. स्वतःचे ताट स्वतः स्वच्छ करतात. स्वावलंबनाचे धडे तर दिले जातातच, शिवाय कष्टाची कामे करण्याची संधी त्यांना दिली जाते. शाळेची छोटीशी बाग आहे. त्यात फळझाडे लावली आहेत. या बागेची जबाबदारी मुलांना वाटून दिली आहे. त्यातून येणारे उत्पन्न हे त्या मुलांमध्ये वाटप केले जाते. मुलांना कमवा आणि शिका या मूलमंत्रातून कष्टकरी माणसाविषयी आदर निर्माण करण्याचा आमचा मानस असतो.

कमवा आणि शिका या योजनेत तुम्हीही सामील होऊ शकता. तुमच्या शाळेत, तुमच्या घरी या धोरणाप्रमाणे काम केलेत तर तुमच्या व्यक्तीमत्वात खूप सकारात्मक बदल होतील. छोट्या गोष्टीपासून सुरुवात करा. कष्टाला अजिबात लाजायचं नाही. कामात सातत्य ठेवायचं, म्हणजे तुम्हाला समाधान नक्की लाभेल.

मंडपाच्या दक्षिणेला उभा असलेला नववीत शिकणारा सचिन पाहुण्यांचे भाषण मनापासून ऐकत होता. स्वयंसेवकाची जबाबदारी त्याच्यावर होती. वर्गातल्या अभ्यासात त्याला फारशी गती नव्हती. मात्र कष्टाची कामे करायला तो सर्वात पुढे असायचा. वर्गातलं कपाट सरकवणे, बाकडे उचलून बाजुला ठेवणे, टेबल आणणे या सगळ्या कामात सचिन पुढे असायचा. ताकदीचे काम असले की शिक्षक सचिनला शोधत यायचे. काम झाल्यावर म्हणायचे, सचिन तू थोडा अभ्यासही करायला हवा. दहावी तरी पास हो!

सचिन अभ्यास करायचा पण त्यात त्याचं मन लागत नसे. मग तो आजीला कामात मदत करायला पुढे जाई. लाकडाची मोळी बांधणे, खळ्यातून धान्याची गोण आणणे, रेशन दुकानातून गहू आणणे या कामात सचिनला भारी इंटरेस्ट! त्याने केलेल्या कामाचं आजी फार कौतुक करायची. त्याला वाटायचं आपण असचं काहीतरी काम करावं, भरपूर पैसे कमवावेत नि आजीला आणून द्यावेत, म्हणजे आजी खूश होईल. अभ्यासापेक्षा त्याला आजीसोबत काम करायला खूप आवडत असे. समोरच्या व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे कामाविषयी बोलतायत तर आपण त्यांना जाऊन कोणतं काम करावं, असं विचारायचं असं सचिनने मनोमन ठरवलं.

पाहुण्यांचे भाषण संपले. मग बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला. आभारानंतर सर्व पाहुणे, पदाधिकारी नि शिक्षक अध्यापकदालनाकडे निघाले. पाहुण्यांना कसे भेटता येईल, असा विचार सचिन करू लागला. सर्वांसमोर आपल्याला बोलता येणार नाही, असे त्याला वाटत होते. तेवढ्यात प्रमुख पाहुणे स्वच्छतागृहाकडे जाताना त्याला दिसले. त्यांच्यासोबत अन्य एक अपरिचित पाहुणे होते. सचिनने आपली जागा सोडली नि तो स्वच्छतागृहाच्या वाटेवर उभा राहिला. पाहुण्यांना नेमका प्रश्न कसा विचारायचा, याची उजळणी तो मनातल्या मनात करत होता. तेवढ्यात पाहुणे परत येताना दिसले. जवळ आल्यावर सचिन म्हणाला.

नमस्कार सर ! मला काही विचारायचं !

अरे व्वा! असे प्रश्न विचारणारी मुलेच आम्हाला फार आवडतात. पाहुण्यांच्या प्रतिसादामुळे सचिनला धीर आला.

सर ! मला स्वतः कमावून, स्वतःच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी काय करता येईल?

तुझ्या घरी शेती आहे?

भातशेती आहे. पण सिंचनाची सोय नाही.

घराभोवती मोकळी जागा आहे?

आहे ! मागे आवार आहे.

मग एखादी कोंबडी विकत घे. तिला वाढव.

आता समजलं. मी तसचं करतो.

पुढच्या भेटीत किती कमाई झाली ते नक्की सांग.

पाहुणे दालनाकडे चालू लागले. तेवढ्यात काही वर्गमित्र सचिनकडे धावत आले. पाहुण्यांशी काय बोललास? पाहुणे काय बोलले? असे बरेच प्रश्न ते विचारत होते. मात्र सचिनने काही नाही म्हणून सर्वांना नव्या प्रश्नात टाकले.

सगळेजण आपापली जबाबदारी पार पाडण्यात दंग होते. सचिन मात्र कोंबडी विकत कशी घेता येईल या विचारात मग्न होता.

घरी आल्यावर सचिनने आजीला आपल्या मनातली योजना सांगितली. आजी म्हणाली,कोंबडी घ्यायला तुला तीनशे रुपये देते. तुझी कमाई सुरु झाली की माझे पैसे परत कर.

सचिनला खूप आनंद झाला. आजीने त्याला शेजाऱ्यांकडून एक निरोगी कोंबडी खरेदी करून दिली. त्यादिवसापासून सचिन त्या कोंबडीची सर्व व्यवस्था पाहतो. तिला दाणे टाकणे, पाणी ठेवणे, संध्याकाळ झाल्यावर पडवीत टोपलीखाली झाकून ठेवणे, सकाळ झाल्यावर आठवणीने कोंबडीला बाहेर काढणे या सगळ्या व्यापात सचिन इतका रमला की त्याची आजी त्याला म्हणते,अरे बाबा! तुझी कोंबडी काही पळून जाणार नाही. वेळ काढून शाळेतला अभ्यासही कर. मग सचिन पुस्तक घेवून वाचत बसे. तरी त्याचे लक्ष कोंबडीकडे जायचे.

यथावकाश कोंबडीने अंडी द्यायला सुरुवात केली. तेव्हा सचिनचा आनंद गगनात मावत नव्हता. आजीने सांगितल्याप्रमाणे त्याने एका टोपलीचा पिंजरा बनवला. त्यात पेंढा ठेवला. मोजून वीस अंडी झाली. कोंबडीने अंडी उबवण्यासाठी पिंजऱ्यात बैठक मारली.

आजी म्हणाली, अशी बैठक मारून अभ्यास केलास तर तू दहावी नक्की पास होशील.

वर्षभरात घरात वाढत असलेल्या एकवीस कोंबड्या पाहून सचिन मनातल्या मनात बाजार भावाप्रमाणे हिशेब करत असतो. शाळेतील प्रमुख पाहुणे पुन्हा कधी भेटले, तर त्यांना त्याच्या कमाईची गोष्ट सांगायची आहे.

# काळगावचा पांडुरंग



बापू पिंगळे
पुणे, मो: ९८२२६१८३१८

सांज वेळफझाली होती. सुर्य अस्ताला निघाला होता. माया-ममतेच्या लाटांवर वेळ हिंदोळे घेत होती. बराच उशिर झाला होता. शेवटी झेंडूच्या फुलांनी सजवलेली बैलगाडी निघाली.... पांडुरंग आणि देवका सहकुटुंब व्याकुळतेच्या अंधाराने गांगरले. आख्या घराचा जीव तुटका झाला... पांडुरंग ची बायको देवका मोठी धिराची बाई. परंतू या प्रसंगी तिचे डोळे थांबेनात. पांडुरंग चे शब्द पांगळे झाले. तसा तो रांगडा गडी. परंतू तोही आतून दयनीय हालला होता. बैलगाडी काळेवाडी ची सिमा पार करेपर्यंत पांडुरंग गाडी मागे झपाझपा पावले टाकत चालत राहिला. बैल-गाडी दिसेनासे होईपर्यंत पांडुरंग चे डोळे त्या गाडीचा पाठलाग करीत होते. त्याची मायेची नजर हटता हटेना. शेवटी जड अंतःकरणाने त्याने हात हलवत वंदना ला निरोप दिला... दिवसभरातल्या धावपळीत पांडुरंग चे तन-मन थकले होते. म्हणून शिवारातील एका चिंचेच्या झाडाखाली तो विश्रांतीसाठी थांबला. त्याक्षणी पायवाटेने घरी निघालेल्या धुळाप्पा ने पांडुरंगला पाहीले. त्याने डोक्यावरचा गवताचा भारा भूईला टेकवला. आणि पांडुरंग जवळ जावून बसला. ते दोघेही काळगावात सालदारकी करायचे. हाडाचे शेतमजूर होते. काय रं पांडोबा! का म्हनून बसलाय इथं सांजच्याला? काय झालं? तंबाखू मळत धुळाप्पाने पांडुरंगला विचारले... पांडुरंगला काय बोलावं ते सुचेना... तंबाखूचा बार ओठात कोंबत धुळाप्पाने पांडुरंगला बोलतं करायचा प्रयतक केला.... आरं बोलं की लेका. कुणाची वाट बघतुया इथं? बिडीचा मोठा झुरका सोडत पांडुरंग म्हणाला... आता कुणाची वाट बघणार बाबा...चल निघूया घरला... चालत चालत समंद सांगतो तुला. .... धुळाप्पा च्या शिरावर गवताचा भार. पांडुरंगच्या शिरावर व्यथांचा भार. अशा अवस्थेत दोघे श्रमीक घराकडे निघाले... पांडुरंग सांगू लागला... काय सांगू धुळाप्पा तूला? आज माझी चिमणी भुर्रकन उडून गेली रं! म्हणजे नेमकं काय झालं रं पांडोबा? धुळाप्पाने बालबोध प्रश्न केला.... दिर्घ श्वास सोडत पांडुरंग म्हणाला... आत्ताच माझी पोरगी वंदना सासरला गेली रं धुळा.. तीन पोरांच्या पाठीवर वंदना झाली. एकुलती एक म्हणून आम्ही तीला जिवापाड जपली. लहानपणापासून वंदना चुणचुणीत होती. नाके-डोळे परीच जणू. पांडोबा, तुझी वंदना खूप हुशार आहे बरं. वर्गात नेहमी पहिली येते. तीला खूप शिकव. ती तुझ्या घराण्याचं नांव मोठं करेल. असं तिचा कुलकर्णी मास्तर मला नेहमी सांगायचा. म्हणून म्या पण मागपुढं पाहीलं नाय. पोटाला चिमटा देत गेलो. पोरीच्या शिक्षणासाठी धरमचंद मारवाड्या कडून कर्ज काढत गेलो. पण पोरीला पैका कमी पडू दिला नाय. डोक्यावर कर्जाचा डोंगुर झाला. बापाजाद्या कडून मिळालेला बिघाभर तुकडा बुधा तात्याला मोपला. अन् धरमचंद मारवाड्याचं कर्ज फेडलं. शेवटी म्या वंदनाचं शिक्षण पुरं केलच... माझी वंदना डी.एड्. झाली. गावतली पहीली मास्तरीन झाली. आख्या गावानं तिचं लयी कौतुक केलं. मला आणि देवकाला आकाश ठेंगण झालं होतं. पांडुरंग मोठ्या अभिमानाने लेकीचे गुण गात होता.... वंदना तालुक्याच्या शाळेत मास्तरीन म्हणून चिकटली. पांडोबा, आता पोरीचे हात पिवळे करा. पोरीच्या जातीचं वेळेवर उरकलेलं बरं. असं नातेवाईक सांगू लागले. वंदना चांगल्या घराण्यात जावी. तीला मनासारखा नवरा मिळावा म्हणून म्या लयी धडपड केली रं. नको त्यांच्या पुढे वाकलो. सगे सोयऱ्यांची हाजी हाजी केली. जातीतली समदं स्थळं पिंजून काढली. पण सगळीकडून कानावर नकार यायचा्. तो नकार कानात सिसं ओतल्यागत वाटायचा. पोरं वर्षाची झाली तरी तीचं लग्न करीत नाय. याला बाप म्हणावं का वैरी्! अशी कुजबूज गावात सुरु झाली... लोकांच्या त्या कुजबुजीला कुठल्या तोंडानं सामोरा जावू? हा प्रश्न मला सतवायचा्. समाज लयी वंगाळ हाय रं बाबा. नियती कुठल्या जन्माचा माझा सुड घेत होती ते देव जाणे. तीनं मला पांढऱ्या डागांनी रंगवलं. अन् माझी पोरगी गैरसमजुतीची शिकार झाली. तिला समाजानं नाकारलं. घरी आलेलं पाव्हणं नाक मुरडायचे. मला दे माय धरनी ठावं असं वाटायचं....

मुलगी सुशिक्षित आहे. मास्तरीन आहे. स्वःताच्या पायावर उभी आहे. म्हणून काय झाले? तिच्या बापाला कोड आहे. त्याच काय? असे जिवघेणे निरोप मध्यस्थीं मार्फत येवून आदळायचे... मी आणि देवका पार खचून जायचो. आमची झोप उडायची. काय करावं? आता वंदनाचं कसं व्हायचं? घरात कुवारी पोरं कुठपावत ठेवायची? लोक काय म्हणतील? लोक कुठल्या नजरेनं तिच्याकडं बघत असतील? हे प्रश्न मला आणि देवका ला मोकार चावायचे... एक दिवस देवका चा मानलेला भाऊ *शिवा आण्णा* लगबगीने घरी आला. मला म्हणाला दाजी, माझ्या ओळखीचं तासगावला एक स्थळ आहे. मुलगा दहावी शिकलाय म्हणे. गावतल्या पतपेढीत शिपाई म्हणून काम करतोय. त्याचा बाप हमाली करतो. मी त्यांना तयार केलंय. त्यांचा होकार आहे. त्या पोराला वंदना देवून टाकू. ती सुधारेल त्या पोराला. शिवा आण्णा तळमळीने सांगत होता.... नियतीनं मला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं होतं. शिवा अण्णाला काय सांगाव ते कळेना? माझी वंदना मास्तरीन. तो पोरगा शिपाई. कसं करावं? घरापर्यंत स्थळ तर चालून आलयं. तेही आम्हाला स्विकारणारं. म्हणून मी शिवा आण्णा पुढं मान हालवली. फकस्त चाललं म्हटल. इच्छा नसताना देवकानं सुद्धा बळबळ हो म्हटलं. वंदनाला आमच्या जीवाची घालमेल बघवेना. म्हणून तीनं पण होकार दिला. तव्हा देवका डोक्यावरचा पदर सावरत शिवा आण्णाला म्हणाली... आण्णा, आगोदर वंदना ला मुलगा बघू द्या म्हणते मी. मुलाचं घरदार बघायला हवं. मग बैठकीचं ठरवू. तेव्हढ्यात वंदना इर्षेने म्हणाली..... नको ग आई! मुलगा काळा की गोरा. गरीब का श्रीमंत. याची मला फिकीर नाही.... आपल्याला स्विकारणारा तो मोठ्या मनाचा माणूस आहे. एव्हढचं पुरेसं आहे. वंदना पदर खोसून पुढे म्हणाली.... माझ्या पप्पांच्या अंगावर कोड आहे म्हणून सगळ्यांनी मला नाकारलं... समाजाने आपली हेटाळणी केली.... या मुलाने लगेच होकार दिला. म्हणजे तो मनाने चांगलाच असणार. गैरसमजचा तोरा मिरवणाऱ्या माणसांपेक्षा समजुतदारपणा दाखवणारी माणसे केंव्हाही बरी. मग ती कमी शिकलेली असोत किंवा गरीब असोत. शिवामामा त्यांना बैठकीला बोलवा. लग्नाचं मुहूर्त ठरवा. माझी तयारी आहे. वंदना शेवटी एव्हढचं म्हणाली.... पप्पा, आता लोकांना ठणकावून सांगा...माझ्याही मुलीचं लग्न जमलं म्हणून.. वंदनाचे ते करारी बोल ऐकून मी तीला मनोमन वंदन केलं... बैठक झाली. मुहूर्त ठरला. पुन्हा धरमचंद मारवाडी कामी आला. वंदनाच्या लग्नात आम्ही मोठ्या उत्साहाने जीव ओतला. अन एका शिपायाला एक मास्तरीन मोठ्या मनानं दान केली.... बोलता बोलता पांडुरंग स्तब्ध झाला..फक्त त्याचे डोळे बोलत होते... पांडुरंगच्या डोळ्यातलं पाणी त्या दिवशी केवळ दुःखाचं नव्हते ते अभिमानाचेही होते. पांडुरंगला धीर देत धुळाप्पा म्हणाला, पांडोबा...यात तूझा कायबी दोष नाय राज्या. नियतीनं तुला माणसांचा अस्सल चेहरा दाखवला. इथ काळ सोखावतो.... अन् गाव भरकटतो.... जावूदे..... तू काळजी करु नगस. तूझी पुण्याई आडवी येईल.... वंदनाचं चांगलच होईल...

# पर्यटन म्हणजे नुसते भटकणे नव्हे...!



उमाकांत चव्हाण

पर्यटन म्हणजे केवळ भटकंती न्हवे ही केवळ एक म्हण नाही, तर तो एक संस्कार आहे. कुटुंबियांसोबतची सहल जेव्हा नियोजनबद्ध असते, तेव्हाच ती खऱ्या अर्थाने आनंददायी ठरते. तुमचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित करण्याकरिता एक मआदर्श नियमावलीफ इथे आपल्याला पाहायला मिळेल, सेव्ह करून घ्या आणि प्रो टिप्स साठी फॉलो करा.

**माहिती घेताना आणि नियोजन करताना...**

सोशल मीडिया किंवा ग्रुपवर सल्ला विचारण्यापूर्वी आणि मिळाल्यावर या गोष्टी पाळा -

सल्ले अनुभवाचे, नियोजन स्वतःचे - लोक त्यांच्या अनुभवावरून सल्ले देतात. पण त्यांनी भेट दिली तो काळ आणि तुमचा काळ यात फरक असू शकतो. त्यामुळे सल्ले जरूर घ्या, पण अंतिम नियोजन स्वतःच्या अभ्यासावर करा.

बेसिक माहिती पोस्ट करा - जेव्हा तुम्ही ग्रुपवर मदत विचारता, तेव्हा तुम्ही किती लोक आहात? वयोगट काय? प्रवासाचे साधन कोणते? आणि मुख्य उद्दिष्ट काय (ट्रेक, मंदिर की बीच)? ही माहिती नक्की द्या.

हवामान आणि काळ - ज्या महिन्यात तुम्ही जाणार आहात, तिथले वातावरण पर्यटनासाठी पोषक आहे का, याची प्राथमिक माहिती आधीच तपासा.

बफर डे (एक अतिरिक्त दिवस) - दिवसांच्या ट्रिपमध्ये नेहमी एक दिवस मएक्स्ट्राफ ठेवा. खराब हवामान, रस्ते बंद होणे किंवा अपघात अशा अनपेक्षित परिस्थितीत हा दिवस कामाला येतो.

**पूर्वतयारी - आरोग्य आणि कागदपत्रे**

आरोग्य तपासणी - निघण्यापूर्वी घरातील ज्येष्ठ आणि मुलांच्या प्रकृतीची खात्री करा. नियमित औषधांचा पुरेसा साठा सोबत ठेवा.

कागदपत्रे - गाडीचे कागद ( , , ) तुमचे आधार कार्ड किंवा ओळखपत्राची मूळ प्रत आणि फोटोकॉपी सोबत ठेवा.

गाडीची तपासणी - जर स्वतःच्या गाडीने जाणार असाल, तर पूर्ण दिवस गॅरेजमध्ये देऊन काम करून घ्या. त्यानंतर - किमी गाडी चालवून खात्री करा, जेणेकरून आयत्या वेळी अडचण येणार नाही.

**सामानाचे स्मार्ट व्यवस्थापन**

कमी सामान, सुटसुटीत प्रवास - दिवसांपेक्षा जास्त प्रवास असेल तर प्रत्येकाची स्वतंत्र छोटी बॅग ठेवा. कमीत कमी कपडे सोबत घ्या.

प्रथमोपचार पेटी - ताप, अंगदुखी, जखम, अपचन आणि बँडेज यांचे छोटे किट कायम जवळ असू द्या.

इलेक्ट्रॉनिक्स - पॉवर बँक, एक्स्टेंशन बोर्ड आणि कॅमेरा मेमरी कार्ड्स तपासून सोबत घ्या.

शॉपिंगवर नियंत्रण - प्रत्येक ठिकाणी शॉपिंग करणे टाळा. केवळ तिथल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि हँडीक्राफ्ट वस्तूच घ्या, (ज्या तुम्हाला तुमच्या घरीही ऑनलाईन मागवता येतील त्यासाठी तिथले नंबर घ्या) ज्या तुम्हाला सहज कॅरी करता येतील.

**प्रवासातील जीवनशैली आणि आहार**

लवकर निजे, लवकर उठे - सकाळी लवकर प्रवासाला निघणे फायदेशीर ठरते. त्यासाठी रात्री लवकर झोपणे आवश्यक आहे.

अन्न आणि पाणी - प्रवासात मखाण्यासाठीफ नव्हे, तर मफिरण्यासाठीफ बाहेर पडलो आहोत हे लक्षात ठेवा. हलका आहार घ्या. सकाळी हेवी नाश्ता (उदा. दाक्षिणात्य पदार्थ सहज पचन होणारे) उत्तम ठरतो.

स्थानिक चवीचा आस्वाद - आपल्या घरचे किंवा नेहमीचे अन्न तिथे शोधण्यापेक्षा तिथल्या ऑथेंटिक (स्थानिक) खाद्यसंस्कृतीचाअनुभव घ्या.

हायड्रेशन- उघड्यावरचे अन्न टाळा आणि पिण्यासाठी स्वतःची बाटली किंवा सीलबंद बाटली वापरा.(२०)

**राहण्याची सोय आणि अनुभव**

होम-स्टेचा अनुभव - केवळ स्टार रेटिंग हॉटेल्स म्हणजे चांगली ट्रिप नव्हे. तिथले स्थानिक जीवन समजून घेण्यासाठी महोम-स्टेफ किंवा महोस्टेल्सफमध्ये राहण्याचा अनुभव घ्या.

संस्कृतीचा आदर - उत्तर असो वा दक्षिण भारत, तिथल्या परंपरा आणि संस्कृतीचा आदर ठेवा. तुम्ही त्यांच्याशी प्रेमाने वागलात तर ते तुमचे उत्तम आदरातिथ्य करतील.

**सुरक्षितता आणि शिस्त**

आर्थिक व्यवहार - जास्त दागिने घालणे टाळा. रोख रक्कम विभागून ठेवा आणि डिजिटल पेमेंटला प्राधान्य द्या.

लोकेशन शेअरिंग - कुटुंबातील जबाबदार व्यक्तीने आपले मलाईव्ह लोकेशनफ घरी असलेल्या जवळच्या नातेवाईकांना शेअर करावे.

संपर्क माहिती - हॉटेलचा पत्ता आणि महत्त्वाचे फोन नंबर्स एका डायरीवर लिहून मुलांच्या किंवा ज्येष्ठांच्या खिशात ठेवा.

कौटुंबिक समन्वय - हे दिवस पुन्हा येतील ना येतील हे जगून घ्या, इथे नात्यातील वाद नको, दिवसाचे नियोजन आदल्या रात्रीच सर्वांनी मिळून ठरवा. मुलांवर आणि ज्येष्ठांवर विशेष लक्ष द्या.

**जबाबदार पर्यटन**

कचरा व्यवस्थापन - प्लास्टिकचा कचरा डस्टबिनमध्येच टाका. आपली पर्यटन स्थळे स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

वारसा जतन - ऐतिहासिक वास्तू, झाडे-झुडपे किंवा वन्यजीवांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्या.

खास टीप - ते दिवसांच्या प्रवासात शरीराला थकवा जाणवू शकतो. त्यामुळे रोजच्या वेळापत्रकात थोडा विश्रांतीचा वेळ नक्की ठेवा. जेव्हा तुम्ही ग्रुप करून फिरता, तेव्हा खर्चातही मोठी बचत होते आणि सुरक्षितताही वाढते.

# शौर्याचे प्रतिक वाघनखे

(पान नं. ३ वरुन) सभासद बखरीमध्येराजांनी डावे हाताचे वाघनख होते तो हात पोटात चालविला. शिवदिग्विजयी बखरीतवाघनखे व तलवार असा उल्लेख आहे. तारीख-इ-शिवाजी या ग्रंथातमहाराजांनीअफजलखानाच्या पोटात वाघनखे खुपसले असे म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथात केळुसकर कृ. अ म्हणतात,छत्रपती शिवाजी महाराजांच्या डाव्या हातात वाघनख होते. ते खानाच्यापोटात चालविले व दुसऱ्या हातातल्या बिचव्याचाही मारा केला व त्याच्या काखेतून आपले डोके चपळाईने काढून घेतले. वाघनख्याचा मारा होताच खानाचे पोट फाडून आतडी बाहेर आली. भागवत वा. रा.या संदर्भात लिहितात,छत्रपती शिवाजी महाराजांनी हातात एक बिचवा व वाघनख चढविले.डाव्या हातातल्या वाघनख्याने जोरानेवार करून अफजलखानाची चरबी बाहेर काढली. ब्रिटीश इतिहासकार ग्रटडफवाघनखे वापरल्याचे स्पष्ट करतो. शिवछत्रपती या ग्रंथात सेतुमाधवराव पगडी वाघनखवापरल्याचे सांगतात. ते म्हणतात, क्षणाचाही विलंब न करता छत्रपती शिवाजी महाराजांनी वाघनखे घातलेला डावा हात चालविला. अफजलखानाच्याकमरेभोवती हात धरून वाघनखे पोटात घुसवून कोथळा बाहेर काढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे साक्षीदार असलेले वाघनखे म्हणजे आपला अमुल्य असा ठेवा आहे. वाघनख्यांना सामाजिक व सांस्कृतिकरित्या खूप मोठे महत्व आहे. वाघनख्या धारदार आणि गूढ असून त्यांच्यावर उत्तम प्रकारे पाने,फुले व प्रतिकेआदि. चे कोरीव नक्षीकाम केलेले असे.छत्रपती शिवाजी महाराजांनीशस्त्रास्त्रांमध्ये आधुनिकतेचा वापर करून प्रगत शस्त्रे तयार केली. वाघनखे हे शस्त्र फक्त छत्रपती शिवाजी महाराजांनीच वापरले व ते जगात श्रेष्ठ बनविले.



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

**माझा खान्देश**

# खानदेशातील ग्रामदैवते




खानदेश हा प्रदेश आपल्या समृद्ध लोकसंस्कृती आणि विशिष्ट ग्राम दैवतांसाठी ओळखला जातो.येथील लोकजीवन शेती निसर्ग आणि लोक श्रद्धेशी जोडलेले आहे. खानदेशातील प्रमुख ग्रामदैवते

वेताळ, बहिरोबा किंवा भैरोबा सप्तशृंगी, गुलाबाई, मरीआई, बिरोबा, बालाजी, मुंजोबा, मारुती, खंडोबा आदी खानदेशातील लोकसंस्कृतीत महत्त्वाचे आहेत.

### वेताळ–

वेताळ खानदेशातील प्रमुख ग्रामदैवत आहे. वेताळ हे ग्रामदैवत भूतावळीचा नायक आहे. वेताळाचे दोन प्रकार आहेत एक रुद्रवेताळ आणि दुसरा अग्निवेताळ. अग्निवेताळालाच महाराष्ट्रात मआग्या वेताळफ म्हणतात. आग्या वेताळ हा प्रखर असतो. आग्या वेताळ या दैवताची खानदेशात गावोगावी चर्चा होते. आग्या वेतळाचे रूपदर्शन रात्रीच्या वेळी घडते असे म्हटले जाते. आग्या वेताळच्या उत्पत्ती कथा वेगवेगळ्या कथांशी जोडलेल्या आहेत. भैरवाचा उद्धटपणा पाहून पार्वतीने दिलेला शाप, चंद्रशेखर नावाचा राजा व राणी तारावतीची कथा,शकुनी पांडवांच्या संबंधित कथा यांच्याशी त्यांचा संबंध जोडलेला दिसून येतो.

आग्या वेताळाच्या उग्र प्रकृतीच्या गुणविशेषमुळे तो लोकमानसात मक्षुद्र देवफ म्हणून मानला जातो.शेंदराने फासलेला लांबट निमुळता मतांदळाफ ग्रामजनात ग्रामदेवता म्हणून पुरातन काळापासून पूजिला जातो. त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी कोंबड्या, बकऱ्यांचा बळी देतात. खानदेशात पुष्कळच्या गावी आग्या वेतळाची व रुद्रवेताळाच्या रूपाची लहान मोठे मंदिरे आहेत. हा लोकमानसातील वेगळा आविष्कार जाणवतो.

**एकनाथांनी म्हटल्याप्रमाणे...**
**वीर झोटिंग नरसिंग चेडा ।**
**वेताळाचा पूजिती खोडा ।**
**शेंदूर माखोनिया धोंडा ।**
**शेळी बोकड जीव घेती की।...**

वेताळ सदैव नग्न असतो. असा संकेत आहे कि,ज्या वेताळाची पूजा होते त्याला वस्त्र वरून नेसवितात.

वैशाख मार्गशीर्ष किंवा माघ महिन्यात खानदेशात वेगळ्या ठिकाणी आग्या वेताळाचे उत्सव साजरे केले जातात. कामनापूर्तीसाठी आग्या वेताळाला नवस केला तर तो नवसाला पावतो, अशी खानदेशातील लोकांची श्रद्धा आहे.

### बहिरोबा किंवा भैरोबा–

मबहिरोबाफ किंवा मभैरोबाफ हा खानदेशातला प्रमुख ग्रामदैवत आहे.शिव या देवतेचे भैरव हे रूप असून भैरव या नामाभिधानाचा अपभ्रंश बहिरोबा,भैरोबा,कालभैरव, बालभैरव अशा विविध नावांनी लोकमानसात रूढ झाला आहे. खानदेशात प्रत्येक गावी बहिरोबाची मंदिरे आहेत.भैरोबा हा खानदेशातील लोकप्रिय क्षेत्रपालक देव. गावाला गस्ती घालून गावाचे रक्षण करणारा ग्रामदेव म्हणून मानला जातो.

भैरवनाथाची पूजा सुरू करण्यापूर्वी सकान करून धूतवस्त्र नेसावे. काया-वाचा-मने करून पूर्व दिशेला तोंड करून बसावे. भैरवपूजा यंत्रावर गहू, हळद ,तांदूळ, पीठ हे ठेवून शुद्ध तुपाचा दिवा लावावा, धूप व उदबत्ती लावून भैरव स्तुतीपर गीते म्हणावीत अशी भैरव उपसकांची पूजा करण्याची पद्धत लोकमानसात रूढ झाली आहे. भैरवाच्या नावांचा जप, भैरव स्तुती, भैरव चालीसा, भैरवाष्टक, क्षमापन स्तोत्र, सहस्त्रनामानि, भैरव लोकगीते, लोककथा या विविध स्वरूपात रूपात भैरवनाथाची पूजा परंपरेने ग्रामजनात रूढ झालेली आहे. भैरवी नवसदेवता आहे. यात्रेच्या वेळी लोक नवस फेडतात. यात्रेच्या वेळी बकरी- कोंबडीच्या रक्ताचा टिळा अर्पण करतात. अंडी, लिंबू वाहतात. सर्पदंश झालेल्या मनुष्यास बहिरोबाच्या गाभाऱ्यात रात्रभर ठेवला असता त्याला विषबाधा होत नाही. असा लोक समज आहे. बहिरोबा बहुजन समाजाचे ग्रामदैवत आहे. बहिरोबाचे उत्सव व जत्रा

### सप्तशृंगी–

सप्तशृंगी खानदेशातील ग्रामजनांची कुलदेवता म्हणून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे पीठ म्हणून महाराष्ट्रवासीय जनतेचे मसप्तशृंगीफश्रद्धास्थान आहे.नाशिक जिल्ह्यातील नांदुरी गडावर सप्तशृंगी चे स्वयंभू मंदिर आहे. तिचे सासर कोकणात आहे तर माहेर खानदेशात.गडावर सात शिखरे आहेत.त्यावर सात देवतांचे वास्तव्य आहे. या सात शिखरांवरून या देवीला मसप्तशृंगीफ असे म्हणतात. सप्तशृंगी हे स्थान म्हणजे दंडकारण्याचा भाग आहे. असे मानले जाते.

सप्तशृंगी देवीची यात्रा नवरात्र उत्सवात घटस्थापनेपासून सुमारे पंधरा दिवस भरते. तसेच चैत्र महिन्यात रामनवमीपासून पौर्णिमेपर्यंत फार मोठी यात्रा भरते. लाखो भाविक यात्रेला येतात. चैत्रात भरणारी यात्रा ही खानदेशवासीयांची अत्यंत महत्त्वाची यात्रा . या उत्सवात देवीचे भोपे देवीचे गुणगान गातात. डफाच्या तालावर भगत-भगतीण हे बोलतात, अंगविक्षेप करतात. प्रसंगी आत्मक्लेषही करून घेतात. अंगात येत असलेल्या लोकांच्या अंगातील वारी काढतात. नवरात्रात देवीचे भक्त नऊ दिवस कडकडीत उपवास करतात. गडावर शिलंगणाचा सोहळा संपल्यानंतर उपवसाची सांगता करतात.

### गुलाबाई–

महाराष्ट्रातल्या काही भागात भोंडला-हादगा, मध्यप्रदेशात व महाराष्ट्रातल्या भागांत भुलोजी- भुलाबाई तर खानदेशात गुलोजी- गुलाबाई या ग्रामददैवतांची श्रद्धेने पूजा केली जाते. खानदेशातील गुलाबाई-गुलोजीच्या चित्रात किंवा मातीच्या मूर्तीत गुलाबाईच्या मांडीवर बाळ व सोबत पाळणा दाखवलेला असतो. मजगताची माता आपल्या लेकराशिवाय राहू शकत नाहीफ याचे हे प्रतीक मानले जाते.गुलाबाई-गुलोजी हा कुमारिका किंवा सोळा वर्षाच्या आतील मुलींनी खेळण्याचा ,मनोरंजन करण्याचा एक उत्सव आहे.हा उत्सव लोकव्रतासारखा बंदिस्त विधीयुक्त चौकटीत जखडलेला नसतो. हा कुमारिकांचा लोकोत्सव आहे

लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे आपल्या मलोकसाहित्याचे अंत:प्रवाहफ्ग्रंथात लिहितात की, हादगा, भोंडला, भुलाबाई (गुलाबाई)हे स्वतंत्र असावेत परंतु नंतर त्यांचे स्वरूप सारखे होऊन ते सर्व खेळ एकमेकांत मिसळून गेले. त्यामुळे हादगा, भोंडला, भुलाबाई (गुलाबाई) याचा विधी-उत्सव व गाणी एकसारखीच असतात.

खानदेशातल्या भूमीत गुलाबाई-गुलोजींची पूजा केली जाते. गुलाबाई म्हणजे पार्वती व गुलोजी म्हणजे शंकर. शिवशक्तीची ही पूजा सुफलीकरणाचा विधी आहे.

गुलाबाई ही कुवार मुलींची देवता आहे. भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी मुली मोठ्या उत्साहाने खानदेशातल्या घरोघरी गुलाबाई-गुलोजीची चित्रे व मातीच्या मूर्ती बाजारातून आणतात. मूर्ती आणण्यापूर्वी मुली स्वतः आई व मैत्रिणींच्या सहकार्य घरातील कोनाडा( गोखला) पांढऱ्या मातीने पोतारुन (सारुन )टाकतात . घर व परिसराची साफसफाई करून वातावरण प्रसन्न करून टाकतात. खानदेशात घरोघरी गुलाबाई ची स्थापना केली जाते. सायंकाळी गावातल्या मुलींनी एकत्र जमायचे व घरोघरी जाऊन गुलाबाईची पूजा, गाणी,आरती व खाऊ असा उपक्रम नित्याने करायची एक परंपरा आहे. मपहिली ग गुलाबाई देवा देवा साजे वफ या गीतामध्ये दररोज मदुसरी गफ मतिसरी गफ या पद्धतीने दिनक्रमाची वाढ करीत म्हणायचे.सोबतीला नृत्यावरची गाणी,टिपरी, वाद-संवाद, बालनाट्य विविध प्रकारची गीते, शेवटी आरती म्हणायची असा दररोजच्या कार्यक्रम. घरातून एका बंद डब्यात पूर्वीच नियोजनपूर्वक ठेवलेला खाऊ आणायचा व तो जमलेल्या सर्व मुलींना ओळखायला सांगायचा. मुलींनी वेगवेगळ्या खाऊंची नावे सांगायची. जोपर्यंत डब्यातला खाऊ ओळखला जात नाही तोपर्यंत विचार राहायचे व खाऊ ओळखला की, मग तो सगळ्या मुलींना प्रसाद म्हणून वाटायचा.

भाद्रपद पौर्णिमेला सुरू झालेल्या उत्सवाची सांगता अश्विन पौर्णिमा म्हणजे कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न होते. खानदेशातील लोक साहित्याचे अभ्यासक श्री.सयाजी मगर यांच्या मते गुलाबाई म्हणजे आदिमाता. या आदिमातेचे गीतांनी खानदेशात मोठा सांस्कृतिक ठेवा जतन करून ठेवला आहे. हे संस्कृती रक्षणाचे काम लहान मुलींनी केले आहे. काहींना गुलाबाई -गुरुजीची गाणी निरर्थक वाटतात. लोक छंदाचे मुक्त रूप मात्र या गीतामधून आढळते.

**– क्रमशः**

---



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

**अर्थवेध**

# आयकर कायदा २०२५ अंतर्गत करपात्र उत्पन्न

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये करव्यवस्था ही अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. सरकारला पायाभूत सुविधा उभारण्यासाठी, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग आणि सामाजिक कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असते, आणि हा निधी मुख्यत्वे कररूपाने नागरिकांकडूनच मिळतो. यामध्ये आयकर हा सर्वात महत्त्वाचा थेट कर मानला जातो. प्रत्येक व्यक्ती, व्यवसायिक संस्था किंवा कंपनी जेव्हा उत्पन्न कमावते, तेव्हा त्या उत्पन्नाचा काही भाग शासनाला कर स्वरूपात द्यावा लागतो. परंतु हा कर कोणत्या उत्पन्नावर लावला जातो, उत्पन्नाची गणना कशी केली जाते, कोणते उत्पन्न करपात्र मानले जाते आणि कोणत्या उत्पन्नावर सवलती मिळतात, हे अनेकांना स्पष्टपणे माहिती नसते. यामुळे अनेक वेळा चुकीची कर गणना, नोटिसा किंवा दंडाचा सामना करावा लागतो.




याच पार्श्वभूमीवर, सरकारने करव्यवस्था अधिक सोपी, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने आयकर कायदा २०२५ लागू केला आहे. या नव्या कायद्यात जुने गुंतागुंतीचे कलम, अवघड भाषा आणि क्लिष्ट प्रक्रिया यामध्ये सुधारणा करून करदात्यांना सुलभ अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः करपात्र उत्पन्न ही संकल्पना स्पष्ट करण्यावर भर देण्यात आला आहे, कारण कोणताही कर मोजताना सर्वप्रथम हेच ठरवावे लागते की नेमके किती उत्पन्नावर कर लागू होतो. अनेक वेळा लोक एकूण उत्पन्न आणि करपात्र उत्पन्न यामध्ये गोंधळ करतात. प्रत्यक्षात, सर्व उत्पन्नावर कर लागत नाही; काही विशिष्ट वजावटी , सूट आणि सवलती दिल्यानंतर उरलेल्या उत्पन्नावरच कर आकारला जातो. आजच्या डिजिटल युगात, नोकरी करणारे कर्मचारी, छोटे व्यापारी, फ्रीलान्सर, स्टार्टअप उद्योजक, शेतमाल प्रक्रिया करणारे उद्योग, तसेच विविध क्षेत्रांतील व्यावसायिक यांचे उत्पन्नाचे स्रोत वाढले आहेत. त्यामुळे करपात्र उत्पन्नाची योग्य समज असणे अत्यंत गरजेचे झाले आहे. उदाहरणार्थ, एका व्यक्तीकडे वेतनासोबतच घरभाडे उत्पन्न, शेअर मार्केटमधील नफा, बँक व्याज किंवा इतर काही उत्पन्नाचे स्रोत असू शकतात. या सर्व उत्पन्नाचा एकत्रित विचार करून योग्य पद्धतीने करपात्र उत्पन्न ठरवले जाते. जर यामध्ये चूक झाली, तर जास्त कर भरावा लागू शकतो किंवा उलट कर चुकविल्याचा आरोप होऊ शकतो. तसेच, नवीन आयकर कायदा २०२५ मध्ये नवीन कर योजना आणि जुनी कर योजना यामधील पर्याय अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत. करदात्यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार योग्य पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे, करपात्र उत्पन्न समजून घेतल्यास आपण योग्य कर योजना निवडू शकतो आणि कायदेशीर मार्गाने कर बचत करू शकतो.

या लेखामध्ये आपण अगदी सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत करपात्र उत्पन्न म्हणजे काय, ते कसे मोजले जाते, त्यामध्ये कोणकोणते उत्पन्न समाविष्ट होते, कोणत्या सवलती वजावट मिळतात आणि आयकर कायदा २०२५ मध्ये कोणते महत्त्वाचे बदल झाले आहेत, याची सविस्तर माहिती घेणार आहोत. हा लेख सर्वसामान्य वाचक, नोकरी करणारे कर्मचारी, लघु उद्योग धारक तसेच नवीन करदाते यांच्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

१. करपात्र उत्पन्न म्हणजे काय?

करपात्र उत्पन्न ही आयकर व्यवस्थेतील सर्वात मूलभूत आणि निर्णायक संकल्पना आहे. एखाद्या व्यक्तीने एका आर्थिक वर्षात ( एप्रिल ते मार्च) विविध स्रोतांमधून कमावलेले एकूण उत्पन्न म्हणजे एकूण उत्पन्न होय; परंतु या संपूर्ण रकमेवर थेट कर आकारला जात नाही. आयकर कायद्यानुसार काही विशिष्ट उत्पन्नांना पूर्णपणे करमुक्त मानले जाते, तर काही उत्पन्नांवर सवलती , वजावटी आणि सूट उपलब्ध असतात. या सर्व कायदेशीर तरतुदींचा विचार करून, करमुक्त उत्पन्न वजा केल्यानंतर आणि मान्य वजावटी लागू केल्यानंतर जी अंतिम रक्कम उरते, तिलाच करपात्र उत्पन्न असे म्हणतात आणि ह्याच रकमेवर कर दर लागू केला जातो. करपात्र उत्पन्न निश्चित करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने केली जाते. प्रथम, व्यक्तीच्या सर्व उत्पन्न स्रोतांचाजसे की पगार, भाडे, व्यवसाय नफा, भांडवली नफा, व्याज इत्यादीएकत्रित विचार करून एकूण उत्पन्न निश्चित केले जाते. त्यानंतर त्या उत्पन्नातून आयकर कायद्यानुसार पूर्णपणे करमुक्त असलेले उत्पन्न (उदा. कृषी उत्पन्न, विशिष्ट भत्ते, काही शिष्यवृत्ती, काही निवडक गुंतवणुकीवरील उत्पन्न इ.) वेगळे काढले जाते, कारण या भागावर कोणताही कर लागू होत नाही. पुढील टप्प्यात, आयकर कायद्यातील विविध कलमांनुसार (उदा. ८०, ८०, ८० इ.) उपलब्धअसलेल्या गुंतवणुकी, विमा प्रीमियम, निवृत्ती निधी योगदान, आरोग्य खर्च इत्यादी वजावटी त्या उर्वरित उत्पन्नातून वजा केल्या जातात. या सर्व कपातींनंतर उरलेली रक्कम म्हणजे करपात्र उत्पन्न होय.

करपात्र उत्पन्न ठरवण्याची प्रक्रिया :

उदाहरणाद्वारे ही संकल्पना अधिक स्पष्ट होते. समजा, एखाद्या व्यक्तीचे वार्षिक एकूण उत्पन्न छ१५,००,००० आहे. त्यापैकी छ५०,००० हे पूर्णपणे करमुक्त उत्पन्न (उदा. कृषी उत्पन्न किंवा विशिष्ट सूट असलेले उत्पन्न) आहे. त्यामुळे कर गणनेसाठी विचारात घेतले जाणारे उत्पन्न छ१४,५०,००० राहते. यानंतर, त्या व्यक्तीने विविध कर-बचत साधनांमध्ये गुंतवणूक करून छ१,५०,००० इतकी वजावट मिळवली आहे. अशा परिस्थितीत, छ१४,५०,००० मधून छ१,५०,००० वजा केल्यावर उरलेली छ१३,००,००० ही रक्कम त्या व्यक्तीचे करपात्र उत्पन्न ठरते. पुढे, या रकमेवर लागू असलेल्या कर स्लॅबनुसार कराची अंतिम रक्कम निश्चित केली जाते.

एक महत्त्वाची बाब म्हणजे करमुक्त उत्पन्न, एकूण उत्पन्न आणि करपात्र उत्पन्न या तीन वेगळ्या संकल्पना आहेत आणि त्यामधील फरक समजून घेणे अत्यावश्यक आहे. करमुक्त उत्पन्नावर कोणताही कर लागू होत नाही, ते कर गणनेतून पूर्णपणे वगळले जाते; तर वजावटी या करपात्र उत्पन्न कमी करण्यासाठी वापरल्या जातात. अनेक करदाते हा फरक समजून घेत नाहीत आणि त्यामुळे चुकीची कर गणना होऊ शकते. त्यामुळे, करमुक्त उत्पन्नाची योग्य ओळख आणि उपलब्ध वजावटींचा योग्य वापर केल्यास केवळ कायदेशीर अडचणी टाळता येत नाहीत, तर प्रभावी कर नियोजन करून करभारही लक्षणीयरीत्या कमी करता येतो.

आयकर कायद्यानुसार कोणते उत्पन्न करपात्र आहे? करपात्र उत्पन्नाचे स्रोत

आयकर कायद्याच्या अंतर्गत करपात्र उत्पन्न हे असे उत्पन्न आहे ज्यावर सरकारकडून कर आकारला जातो. भारतातील करपात्र उत्पन्न विविध स्रोतांमधून येऊ शकते, जसे की:

१. पगार नोकरीमधून मिळणारे उत्पन्न, त्यामध्ये मूलभूत पगार, , भत्ते, आणि इतर लाभ समाविष्ट असतात.

२. गृह मालमत्तेचे उत्पन्न जर आपल्याकडे घर किंवा मालमत्ता आहे जी भाड्याने दिली आहे, तर त्यातून होणारे उत्पन्न करपात्र असते.

३. व्यापार किंवा व्यवसायातील नफा व्यवसाय किंवा व्यवसायातून होणारा नफा करपात्र असतो.

४. भांडवली नफा मालमत्ता विकून होणारा नफा, जसे की जमीन, घर, शेअर्स इ. यांवर कर लागू होतो.

५. इतर स्रोतांमधून उत्पन्न व्याज, लाभांश, लॉटरी, इ. यांच्यावरही कर लागतो.

करपात्र उत्पन्न समजून घेणे हे केवळ कर भरण्यासाठीच नव्हे तर आर्थिक शिस्त राखण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. आयकर कायदा २०२५ मुळे करप्रणाली अधिक सोपी आणि पारदर्शक झाली असली तरी प्रत्येक करदात्याने आपल्या उत्पन्नाचे स्रोत, उपलब्ध सवलती आणि योग्य कर योजना यांची अचूक माहिती ठेवणे गरजेचे आहे. योग्य नियोजन, वेळेवर रिटर्न भरने आणि कायदेशीर तरतुदींचा योग्य वापर केल्यास आपण केवळ कर बचतच करू शकत नाही, तर देशाच्या विकासातही आपला मोलाचा वाटा उचलू शकतो.

---



# आजचं जगणं खरंच महाग झालं आहे का...?

पूर्वी गरजा मर्यादित होत्या आणि माणसं समाधानात जगायची. आज मात्र गरजा वाढल्या, अपेक्षा वाढल्या आणि त्याचबरोबर वाढलं ते म्हणजे जगण्याचं ओझं. रोजच्या धावपळीत आपण किती कमावतो यापेक्षा, किती टिकवतो याचीच चिंता जास्त वाटू लागली आहे.

आई-बाबांच्या चेहऱ्यावरचं ते न सांगता कळणारं काळजीचं सावट महिन्याच्या शेवटी खिशात उरलेले काही मोजके पैसे आणि त्यातूनही घर चालवण्याची धडपड हे सगळं पाहताना मन नकळत भरून येतं.

आपल्या स्वप्नांनाही आता किंमत लावावी लागते हे परवडणार नाही म्हणत आपण स्वतःलाच थांबवतो.

भाजीपाला असो, पेट्रोल असो किंवा घरभाडं प्रत्येक गोष्ट दिवसेंदिवस हाताबाहेर जात आहे. महिन्याच्या सुरुवातीला केलेला बजेटचा हिशोब, महिन्याच्या शेवटी पूर्णपणे कोलमडून पडतो. आणि या सगळ्यात माणूस मात्र हरवत चाललाय त्याचं हसू, त्याची शांत झोप, त्याचं मनमोकळं आयुष्य.

जगण्यासाठी पैसा लागतो, हे खरं आहे पण फक्त पैशासाठी जगणं ही किती मोठी शोकांतिका आहे! आज अनेक जण आपल्या कुटुंबासाठी, आपल्या स्वप्नांसाठी दिवसरात्र मेहनत करत आहेत. पण त्या मेहनतीचं समाधान किती जणांच्या वाट्याला येतं?

महागाईने फक्त वस्तूंचे दरच वाढवले नाहीत, तर नात्यांमधली उबही कमी केली आहे. वेळेअभावी आपण आपल्या माणसांपासून दूर जातोय. एकत्र बसून दोन क्षण बोलणंही आता लक्झरी वाटू लागलं आहे.

कधी काळी छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद सापडायचा आज मोठ्या गोष्टी मिळाल्या तरी मन मात्र रिकामंच वाटतं. कारण आनंद विकत मिळत नाही आणि तो मिळवण्यासाठी लागणारा वेळ, तोच आज आपल्या जवळ नाही.

कधी कधी वाटतं खरंच एवढं महाग झालं आहे का जगणं? की आपणच काहीतरी हरवलं आहे या धावपळीत?

महागाईने फक्त खिशावर परिणाम केला नाही तिने मनावरही ओरखडे उमटवलेत.

नात्यांमध्ये अंतर वाढलंय संवाद कमी झाला आहे

जगणं महाग झालं असेल पण ते सुंदर बनवणं अजूनही आपल्या हातात आहे. थोडा वेळ स्वतःसाठी काढूया, आपल्या माणसांसाठी जगूया कारण शेवटी, पैशांपेक्षा आठवणीच जास्त मौल्यवान असता

---

# दार उघड बये दार उघड...!

**(पान नं. ३ वरुन)** सगळं मला कळणं अतिशय गरजेचं आहे, ही जाणीव केव्हा होणार? त्यासाठी मनाची कवाडं कधी उघडणार बये!

**विघटन की संघटन**

मागच्या महिन्यात बीडमध्ये भयंकर घटना घडली. चुकून गाडीचा जरासा धक्का लागला म्हणून एका निवृत्त सैनिकावर जीवघेणा हल्ला झाला. काही मिनिटांत रही!म शे!ख नावाच्या गुंडाने मोठी गँग जमा करून त्या सैनिकाला बेदम मारहाण केलीच वर त्याच्या संपूर्ण अंगावर उकळता चहा टाकला. अजूनही वेदनांनी ओरडणारा त्यांचा आवाज ऐकवत नाही. ज्या सैनिकाच्या जिवावर इथे सुरक्षित राहून ऐशोआरामात जगताय त्याच्याच जिवावार उठताय? असा कोणताही जमाव धाऊन आला तर विघटनवाद पसरवणाऱ्या जातीजातींच्या झुंडी वाचवणार आहेत का? की संपूर्ण समाज एकत्र येऊन या आक्रमणाला थोपवणार आहोत हा विचार गांभीर्याने करावा.



**सुसंवादाचा पूल**

पालक -पाल्य हा संवाद उत्तम हवाच. त्यातही आईची भूमिका महत्त्वाची आहे. एक गोष्ट पालकांशी बोलतांना जाणवते धर्म, धर्माधर्मांतले वाद, हे सगळं कशाला सांगायचं ना मुलांना? आणखी लहान आहेत ते!पुढे तर भारतात रहातील की नाही हेही माहित नाही! लहान मुला मुलींबरोबर घडणारे इतके भयंकर गुन्हे,त्यांचं शोषण होत असूनही आपण आपल्या मुलांना मात्र गुलाबी फुग्यात वाढवणं ही केवढी मोठी चूक आहे! आणि या साऱ्या भोवती घडणाऱ्या गोष्टी भारतापुरत्याच मर्यादित आहेत का?

इथे असणाऱ्या धर्मांची मुख्य शिकवण, त्यांचा उगाम, आत्तापर्यंतचा इतिहास, त्या धर्माची मूल्यं, तुलनात्मक गोष्टी,आताची आव्हानं.. हे सारं मोकळेपणाने मुलांना शिकवायला नको? एखादी गोष्ट ही वरवर वाटणारा गुन्हा आहे की एखाद्या धर्माची मूळ शिकवण आणि त्याचा अविभाज्य भाग हे स्पष्टपणे त्यांना कळायला नको? की दहशतवाद्यांशी लढण्यासाठी सैनिकांनीच मरण झेलायचं? नक्षलवाद मोडून काढताना पोलिसांनीच जीव धोक्यात घालायचा? नागरिक,पालक म्हणून माझी जवाबदारी काय? विचार करा. घराबाहेर पडल्यावर मुलं कुठल्याही प्रकारच्या बुद्धिभेदाला बळी पडणार नाहीत एवढा आपल्या संवादाचा पूल पक्का आहे का? स्वतःला विचारा.

**लढाई टाळणं हाच ती जिंकण्याचा सर्वोत्तम उपाय**

दुर्बलता झटकून द्यावी. आत्मविश्वास, धाडस, चातुर्य, मुख्य म्हणजे निर्णयक्षमता इ. कितीतरी नेतृत्त्वगुण मला वाढवले पाहिजेत असा निश्चय करूया. शारीरिक, मानसिक, भावनिक,बौद्धिक, आध्यात्मिक जगण्याच्या या सगळ्या पातळ्यांवर मी सशक्त झालंच पाहिजे. समर्थ,विवेकी स्त्री ही काळाची गरज आहे.

**पितापुत्रभ्रातृंश्च भर्तारमेवं**
**सुमार्गं प्रति प्रेरयन्तीमिह**

अर्थात वेळ आल्यावर स्वतःचा पिता, पुत्र,भाऊ,पती या सर्वांना देखील सन्मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करणारी अशी भारतीय स्त्री आहे! ती स्वतःच दिशाहीन होऊन कसं चालेल?

साहसी खेळ असो वा तंत्रज्ञान..भारतीय मुली आज प्रत्येक क्षेत्रात एकेक शिखर काबीज करत आहेत. तरुणींनो, शिक्षण घ्या, स्वप्नं बघा, आतोनात मेहनत घेऊन तुमचं ध्येय साध्य करा पण वैयक्तिक आयुष्यातही योग्य निर्णय घ्या. मोहांना बळी पडू नका. नाही तर मिळवलेलं यश, जिवाला जीव देणारं कुटुंब, स्वातंत्र्य.. सारं गमावून बसाल. त्यासाठी अविवेकाची झापडं उघडून डोक्यात विवेकाचा प्रकाश पडू द्या! आत्मभान जागं करा. या क्रूर रक्तबीज रक्षासाला संपवण्यासाठी आपल्याला समर्थ व्हायलाच हवं!

# शब्दझुला

## गरज पुस्तकांची

गरज नाही पुस्तकांची
सारेच म्हणू लागलेत
इंटरनेटवर सार काही
क्षणार्धात येवू घातलेत
अबालवृद्ध ऑनलाइन
शिकून फार शहाणे झालेत
नष्ट होतेय वाचन संस्कृती
सगळे मदमस्तावलेत
प्रश्नांची उत्तरे शोधायला
मानाखाली, मोबाईल हातात
ऱ्हास मानवाचा कालियुगात
गुगलवर सर्च मारतात
पुस्तकातील ठेवा अमूल्य
नेटवर कॉपी पेस्ट करतात
पुस्तक श्रेष्ठ गुरु सर्वांचे
नेटची फुशारकी मारतात
तत्त्व, तंत्र, भाग्य, विज्ञान,
आहार , वैद्यक सारे पुस्तकात
ठेवा अनादिकाली लिहिला
म्हणुन इंटरनेट आज फर्मात
पुस्तक दिशा, मार्गदर्शक
मानव बुध्दिवान सृष्टीत
पाया विज्ञान निर्मितीचा
गरज पुस्तकांची जीवन दृष्टीत

**सौ.शामला पंडित (दीक्षित)**
चिंचवड पुणे

## मोहमाया

क्षणा क्षणांचे बुडबुडे
सांगा कितीदा स्मरावे
तेच ते तेच ते तेच ते
मनी कां स्मरत रहावे
झाले गेले सारे सरले
हिशेब कोणते करावे
घडणारे ते घडूनी गेले
भाकित कसे जाणावे
केवळ जगणे पुरुषार्थ
विवेकेच जगती जगावे
तुझे न माझे काही इथे
हे नग्नसत्य उरी जपावे
मोहमाया,पाश मृगजळ
कर्मभोग , भोगत जगावे
ऋणानुबंधी गाठी साऱ्या
प्रेमभावे मने जपत रहावे

**-वि.ग. सातपुते**

## मी वसुंधरा


जसा चितारतो चित्रात मला
नेत्रात साठवून चित्रकार
तसाच
तुझ्या मनाच्या गाभाऱ्यातील
शब्दसुमने वेचून
तू लिही कविता
माझ्या निर्मळ लावण्यरूपी
सौंदर्यावर.....
फुलवीन मी माझे रूप
जलद भरून आलेल्या
वरूण धारांनी न्हाऊन
घेतल्यावर
माझ्या मुखकमलावर
विराजमान
दलकमलांवर....
नयनसुखात चिंब भिजवणाऱ्या
आरसपाणी नेत्र तळ्यांवर....
सळसळत्या जलधारातून
ओघळणाऱ्या जलबिंदू सम
पानांवर पडलेल्या दवबिंदूंवर
विविधरंगी पुष्पसुमनांनी
तरू शिखरावर माळलेल्या
वेणीवर.....
हिरव्या जरीकाठी बुट्टेदार
नेसलेल्या शालूवर....
सोनेरी किरणानी लकाकणाऱ्या
सुवर्ण कांतीवर
आणि
मावळतीला क्षितीज शिखरांवर
विराजमान सुर्यरूपी
शिरोमणी मुकूटावर...
तू लिही कविता
माझ्या सौंदर्यावर
फुलवीन मी माझे रूप
मी अनभिषिक्त
सौंदर्य सम्राज्ञी
मी वसुंधरा.....

**-चंद्रशेखर प्रभाकर कासार चांदवडकर, धुळे.**

## जगण्याची नवी दिशा देतात...

ग्रंथ आपुले गुरु आहेत
असे ज्ञानाचे भंडार ...
घेऊ उंच भरारी सारे
बनेल जीवन सुंदर...
वाचाल तर वाचाल
ग्रंथात भरले ज्ञान भंडार...
एकेक ग्रंथ सांगे
आपणा जीवनाचे सार...
ज्ञानदीप उजळती आपुला
नवी दिशा देती जीवनाला...
उमलती स्वप्नांची फुले
देती चालना विचाराला...
मन समृद्ध करी
ज्ञानसागरात अनेक मोती मिळतात
जपूया ग्रंथांशी अतूट नाते
ते जगण्याची नवी दिशा देतात

**- विजया भट. धुळे**



## माझ्या गावातली कोरडी नदी

माझ्या गावातली नदी
भरभरून वाहायची
आख्या गावाच्या घागरी
काठोकाठ भरायची
भल्या पहाटे गुरढोर
पाणी प्यायला यायचे
लहान लहान पोरं
डूबकी मारून जायचे
गावातल्या आयाबाया
कपडेलत्ते धुवायचे
गाड्याघोड्या गुरढोर
स्वच्छ करून घ्यायचे
माझ्या गावातली नदीचं पाणी
शेती मातीही व्हायच
हिरव हिरव शेत पाहून
हसू गालावर फुलायचं
वाहत्या नदीच पाणी
साऱ्या गावाला पुरायचं
काठावरची झाडंझुडपं
मोठ्या डौलानं डुलायचं
तहानलेले चिमणी पाखरे
काठावर येऊन बसायची
थेंब थेंब पाणी पिऊन
नदी सोबत गप्पा करायची
माझ्या गावातली कोरडी नदी
आठवणीत जगते
वर आभाळाकडे पाहून
येरे येरे पावसा हाका मारते
कोरडी झाली नदी
आटून गेले वाहत पाणी
वाळू वरच्या पाऊल खूणा
आता झाल्यात अनवाणी

**संजय धनगव्हाळ**
(अर्थात कुसुमाई)



## गावनी याद

जवय गावनी याद माले येस,
जीव कसा झुरी झुरी जास धृ
हक्क आपुलकीनी वञ्री
न्यामीनी मानुसकी,
मायममतानी खरी तठे ऱ्हास
मोठायकी,
कायजी आदरनी खरी शान
देस
जरी शे आज पद पैसा तरी
गावसारखं समाधान नही,
हासीखुशी मस्करी मज्जा
गावशिवाय कथी नही,
तठे चवदार लागस गोडीना
घास
संस्कार संस्कृतीथून गाव
शिवनी घडावं,
नोकरी व्यवसायनी आथं
शहेरम्हा बलावं,
धुंडस मन मनं ती गावनी कोस
आखाजी दिवाई नी
कानबाईना सन उत्सव,
मोठी आस्थातून काढतस भरी
रमा गमानी उनीव,
सदा गावम्हा रमेल जीव ऱ्हास
।।।।

**- कॅप्टन डॉ.जितेंद्र लताबाई जिजाबराव देसले**

## हृदय सांगते नाथ असुनी मी

झालो आज अनाथ!
जन्मापासुन स्वरलक्ष्मींची,
मला लाभली साथ!
घातामागुन घात असे हे,
कळे न कुठले पाप?
रडणे आता कुठे सोसते,
क्षणी जिव्हारी धाप!
पचवायाचे वय का आता?
हद्द सोसण्याची!
वेळ कशी ही अद्भुत नशिबी,
जखम पोसण्याची?
मान्य मला की प्रत्येकाच्या,
नशिबी असला काळ!
आत्मियतेने हाक कुणाची,
येईल आता...बाळ!
लता वाळली,आशा सरली,
उषा,मिना मागे!
काळ सांगतो रसिकाना की,
तिन्ही जीर्ण धागे!
देवू आता कसले संगित?
गाऊ कशी गाणी?
देवापाशी मुक्कामाला,
गेली देववाणी!
जाणारांची होते सुटका,
उरलेल्या शिक्षा!
विभुती आहे माझ्यासाठी,
थंडगार रक्षा!
जे जे स्वर्गीय कसे रहावे,
कायम धरणीवर?
घाव सोसतो सोने असुनी,
अता ऐरणीवर!

**- प्रमोद जोशी,देवगड**
९४२३५१३६०४

## आरोग्यम् धनसंपदा

डॉ.नितीन जाधव
मो.९८९२३०६०९२



# शारीरिक दुर्बलता करा कायमची नष्ट

वैवाहिक जीवन सुखी राहण्यासाठी कोणत्याही पुरुषाचे शारीरिक स्वास्थ्य पूर्णपणे स्वस्थ, निरोगी असणे आवश्यक आहे. शरीरात कोणत्याही प्रकाराची कमजोरी असल्यास वैवाहिक जीवनात दुःख आणि अडचणींमध्ये वाढ होते.

एखाद्या पुरुषामध्ये शारीरिक कमजोरी असेल तर त्याचे वैवाहिक जीवन सुखी राहू शकत नाही. तुम्हालाही एखादी शारीरिक कमजोरी असेल तर आम्ही तुम्हाला थंडीच्या दिवसांमध्ये उपयोगात आणले जाणारे काही रामबाण उपाय सांगत आहोत. या उपायांनी कमजोरी, नपुंसकता या समस्या मुळापासून नष्ट होतील.

- २०० ग्रॅम लसुन बारीक करून त्यामध्ये ६० मिली मध मिसळून हे मिश्रण स्वच्छ बाटलीत भरून एखाद्या धान्यामध्ये ३१ दिवस ठेवा. ३१ दिवसानंतर हिवाळ्यात दररोज १० ग्रॅम मात्रेनुसार ४० दिवस या मिश्रणाचे सेवन करा. यामुळे यौन शक्ती वाढेल.

- एक ग्रॅम जायफळ चूर्ण दररोज पाण्यात टाकून पिल्यास काही दिवसांमध्येच यौन दुर्बलता दूर होण्यास मदत होईल.

बदामात ऊर्जा वाढवणारे सर्व आवश्यक घटक आढळतात. यात मॅगनीज, व्हिटॅमिन ई, ताबे, आणि व्हिटॅमिन बी -१२ मोठ्या प्रमाणात असते. नपुंसकता दूर करण्यासाठी - बदाम, चारोळ्याचे दाणे ( ग्रॅम) आणि तीन विलायची एकत्र कुटून घ्या. दररोज रात्री झोपण्यापूर्वी या मिश्रणाचे सेवन केल्यास नपुंसकता दूर होईल.

गाईच्या शुद्ध तुपाने मानसिक, शारीरिक, बौद्धिक विकास होतो. शुद्ध तुपाच्या नियमित सेवनाने बळ, वीर्य व आयुष्य वाढते आणि पित्त शांत होते. अशा पद्धतीने स्त्री-पुरुष संबंधातील सर्व समस्या दूर होतात.

- एक ग्लास दुधामध्ये एक चमचा गाईचे तूप आणि खडीसाखर टाकून पिल्यास शारीरिक, मानसिक कमजोरी दूर होते.

डाळिंब खाल्ल्याने शरीरात शक्ती आणि विशेष प्रकारची उर्जा निर्माण होते. या झाडाची पान व छिलक्याचा औषधी रुपात वापर केला जाऊ शकतो. डाळिंब हृदय रोग, तणाव आणि यौन जीवनासाठी फायदेशीर आहे. स्वप्नदोषाची समस्या असेल, तर डाळींबाचे छिलके वाळवून त्याचे चूर्ण करावे. रोज सकाळ संध्याकाळ एक चमचा या चुर्णाचे सेवन करावे.

एक किलो गाजर, ग्रॅम साखर, ग्रॅम खवा, ग्रॅम दुध, ग्रॅम नारळाचा खीस, मनुका ग्रॅम, - काजू, एक चांदी वर्क आणि चार चमचे शुद्ध तूप घ्या.गाजर खिसुन एका कढाईमध्ये टाका, पाणी सुकल्यानंतर त्यामध्ये दुध, खवा आणि साखर टाका. सर्व मिश्रण एकजीव होत आल्यानंतर त्यामध्ये मनुका, बदाम आणि काजू टाका. हा हलवा तयार झाल्यानंतर ताटामध्ये काढून त्यावर चांदी वर्क लावा. या हलव्याचे चार-चार चमचे सकाळ संध्याकाळ खाऊन त्यावर दुध प्या. यामुळे वीर्य शक्ती वाढून शरीर मजबूत होईल.

एक मोठ्या आकाराचे सफरचंद घ्या. यामध्ये जेवढ्या बसतील तेवढ्या लवंगा लाऊन टाका. याचप्रकारे एक मोठे लिंबू घ्या. यामध्येही जेवढ्या बसतील तेवढ्या लवंगा लाऊन टाका. त्यानंतर या दोन्ही फळांना एक आठवड्यापर्यंत एखाद्या भांड्यामध्ये झाकून ठेवा. एक आठवड्यानंतर दोन्ही फळांमधील लवंगा काढून त्या वेगवेगळ्या बाटलीमध्ये भरून ठेवा. पहिल्यादिवशी लींबामधील दोन लवंगा बारीक कुटून बकरीच्या दुधासोबत सेवन करा.अशाप्रकारे आलटून-पालटून दिवस - लवंगा खा. हा सेक्स क्षमता वाढवण्याचा सोपा आणि रामबाण उपाय आहे.

मोड आलेले धान्य उर्जेचा चांगला स्रोत असतात. मोड आलेल्या धान्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन बी १, बी २, बी ३, प्रोटीन, काबरेहायड्रेट असते. यामुळे व्यक्ती निरोगी आणि तंदुरुस्त राहतो. हिवाळ्यात रोजच्या आहारात १०० ग्रॅम मोड आलेले धान्य असावे.

दोन चमचे आवळ्याच्या रसामध्ये एक छोटा चमचा आवळ्याचे चूर्ण तसेच एक चमचा मध मिसळून हे मिश्रण दिवसातून दोन वेळेस सेवन करावे. यामुळे सेक्स शक्ती हळूहळू वाढू लागेल. अशा प्रकारच्या समस्यांमध्ये आवळा फार फायदेशीर ठरतो. ज्या लोकांना अत्याधिक स्वप्नदोषाची समस्या असेल त्यांनी आवळ्याचा मुरब्बा नियमित खावा.

ग्रॅम ओवा पांढ-या कांद्याच्या रसामध्ये भिजवून वाळवून घ्या. वाळवल्यानंतर परत एकदा कांद्याच्या रसामध्ये भिजवून वाळवून घ्या. असे तीन वेळेस करा. त्यानंतर याचे चूर्ण करून घ्या. अर्धा चमचा चूर्ण दररोज खडीसाखरासोबत सेवन करा. त्यानंतर कोमट दुध प्या. एक महिना हा उपाय करावा. यादरम्यान संभोग करू नये. हा सेक्स क्षमता वाढवण्याचा चांगला उपाय आहे.

अर्धा किलो चिंचाचे बी (चिंचुके) घेऊन त्याचे दोनन भाग करा. हे चिंचुके तीन दिवस पाण्यामध्ये भिजवून ठेवा. त्यानंतर त्यावरील सालपट काढून फेकून द्या आणि पांढरे चिंचुके बारीक कुटून घ्या.त्यानंतर यामध्ये खडीसाखर मिसळून काचेच्या बाटलीमध्ये हे चूर्ण ठेऊन द्या. अर्धा चमचा दर्रोस सकाळ-संध्याकाळ या चुर्णाचे दुधासोबत सेवन करा. या उपायाने संभोग करण्याची शक्ती वाढेल.

# सुरावट

मृणाल शामराज
पुणे, मो. ७७०९१९८१२४

सकाळ उमलून आली हती. आसमंतताला ओला, कोवळा अंधार बाजूला सारून ती लुसलुशीत उन्हाची कोवळी तिरिप अंगणभर पसरू पहात हती. मोठ्या बां च्या कुशीत, दुलाईच्या आड पहुडलेली रावी उगीचच कुस बदलत हती.

बेटा, उठ आता.बघ सकाळ झाली. बां, असं ग काय. अजून उजाडलंय कुठे? अगं, डोळे उघडून बघ तर जरा. आता उन्हाची तिरिप तिच्या अंगावर आली हती.त्या कोवळ्या उन्हाची उब अंगाला लपेटून तिनं बां च्या मांडीवर मान घुसळली. बां नी रावीच्या डोक्यावर मायेनी हात फिरवत म्हटलं, कान्हा केव्हाच उठला आहे बघ. वाट बघतोय ना तो तुझी. कान्हाचं नावं घेताच रावी तडकन उठून बसली. दडदड पायऱ्या उतरीत ती देवघराकडे गेली. बां बघत होत्या. आई, वडिलांविनाची पोरं ही.तरुण मुलगा, सुन गेले. या कोवळ्या लेकराकडे बघून आपण सारं दुःख विसरलो. आता ही वेल फोफवली आहे. तिला योग्य आधाराची गरज आहे. बघू आज मुरारीबाप्पाना बोलवून घेवू. पंचक्रोशीतली चांगली घराणी, तिथली उपवर मुलं त्यांना माहिती आहेत. राधेकृष्ण, राधेकृष्ण..म्हणत त्या उठल्या. अगं, अंघोळ करून देवघरात जा, म्हणेपर्यंत रावी आत पोचली हती.

त्या देवघरात कोंदलेल्या अंधारात समयांच्या मंद प्रकाशात ती शामल शांत कृष्णमुर्ती उजळून निघाली हती. ते लोभस रुप नजरेत साठवून घेतांना रावीचे डोळे भरून आले. ही वंश परंपरागत चालत आलेली मुर्ती.तिची पुजा रावी लहानपणापासून पहात आलेली. वेडचं लागलं होतं त्याचं तिला. तासनतास ती मुर्ती बघत राहायचा ध्यासच लागला होता तिला. त्याचा तो शामल वर्ण, कोरीव डोळे, मोहक हास्य आणि ती त्याची वेळूची बासरी ती मुग्ध होऊन जाई.दुपारी कथा सांगायला बुवा येतं. ओसरी भरून जाई.भागवत ऐकताना ती कृष्णमय होई. ते कान्हाच्या हातातल्या,न ऐकलेल्या पाव्याचे सूर तिच्या कानात गुंजत रहात .तिला कळत नव्हतं ही कसली हुरहूर वाटते आपल्याला. कुठले सूर ओढून नेताहेत मला.

कुठे... का ही जगवेगळी ओढ. बां ना वेगळीचं काळजी हती. ही तरणी पोरं. इतकं देखणं रुप. पण कधी नटणं नाही, फार कुणी मैत्रिणी नाही. दिवसभर कान्हा.. कान्हा. त्याला सुंदर हार करणं. छान कपडे शिवणं,त्याच्याशी तासनतास बोलत राहणं. तोच तिचा सखा.. तोच सोबती. कसं व्हावं हीचं? तिला असं जगण्याची जणू सवय झाली हती. तिला कान्हाच्या हातातल्या वेणूचे स्वर्गीय सूर ऐकू येतं. बां म्हणायच्या, खुळी झाली आहेस तु रावी. रावी फक्त मंद हसायची. आणि एकदिवस खरंच ते दिव्य सूर तिच्या कानावर आले. बां.. बां.. ऐक ना.. तुला ऐकू येतंय का ग काही? बां नी लक्ष देऊन ऐकलं..हो, कुठून तरी दुर सूर ऐकू येताहेत. तिनं चाहूल घेतली. दुर नदीच्या काठावर असलेल्या त्या आम्रवनातून येणारे सूर तिला तिकडे ओढत होते. ती वेडावून गेली,धुंद झाली त्या स्वरांनी. स्वतःला नेमकं काय होतंय ह तिला कळत नव्हतं.

तिनं कळशी उचलली आणि वेगाने ती बाहेर पडली. बां ना ही नवल वाटलं, , ही पाणी आणायला का चालली आहे आत्ता?

ती झपझप चालत नदीच्या वाटेला लागली. एक दगडी उतरण उतरून ती पायवाटेला लागली. नदीच्या काठाला लागून पसरलेल्या आम्रवनात जशी ती पोचली तसे सूर अजूनच जवळ वाटू लागले. तिची ओढणी तिनं सावरली.पायातले पैंजण नाजूकसा नाद करत होते. आसावल्यासारखी ती चालतच हती. आता ते सूर कानाशी रुणझुण करू लागले.समोरच असलेल्या झाडाच्या खोडावर तिची नजर स्थिरावली. एक शामल सुंदर, देखणा तरुण झाडावर रेलून पावा वाजवण्यात मग्न होता.त्याच उपरणं खांद्यावरून घसरलं होतं. दंडावरचं तुळशीपत्र त्यामुळे उठून दिसतं होतं.त्याची तंद्री मोडू नये म्हणून ती कळशी तशीच हातात घेवून स्थिर उभी राहिली. हवेत एक प्रकारचा ताजेपणा भरून राहिला होता.त्याची लांबसडक बोट अलगद त्या पाव्यावरून फिरत हती. ती त्या स्वर्गीय स्वरांत भान विसरली.कुठलं तरी सुखं शिगोशिग मिळालेल्या, तृप्ततेनी तिनं डोळे मिटून घेतले.अलगद कळशी बाजूला ठेवून तिची कोमल पाऊले थिरकू लागली. पैंजणाचे ते नाजूक नुपूर कोमल नाद करू लागले. त्यालाही एक क्षण कळेना हा नाद कसला. त्यानी पावा वाजवणं थांबून तिकडे बघितलं. त्याचे ते काळेभोर डोळे... ती बघतच राहिली. कोण तू.. मी रावी .. हिराबांची नात. इकडे काय करतेस.. तुझ्या सुरांनी ओढून आणलं रे मला. किती दिवस झाले, मला ह्याची ओढ लागली हती.काय आहे असं या सुरात.दिवसरात्र मला तेच ऐकू येताहेत. सांग नां तू कोण आहेस? तो मधुर हसला. ओळखलं नाहीस का ? अगं मी तोच आहे. दिवसरात्र माझ्याशी बोलतेस आणि ओळखलं नाहीस मला.. अरे.. तू कसा इथे येऊ शकशील? तुझं नावं काय ? ती अविश्वासानी म्हणाली. परत तेच मधुर हास्य. सांग ना, खरंच का तू कान्हा आहेस. अरे पण मला ऐकू येणारे ते सूर.. हो, मी तोच आहे. आणि सूर ही तेच आहेत. हा असा रोखून बघत मधुर हसत हसत,वाऱ्याच्या झुळकीसारखा निघून गेला.रावीला कळत नव्हतं. ह स्वप्न आहे का सत्य. ती वळली. तिच्या लक्षात आलं कळशी राहिली. ती घेण्यासाठी ती पुढे गेली. आणि पाहिलं तर तो पावा तिथेच होता. ती हरकली. स्वतःलाच स्वतःवर उधळ्त ती घरी परतली. बां नी तिच्याकडे विस्फारलेल्या नजरेनी पाहिलं. ती हसत बां ना चिकटली. काय ग.. बां, आज ना मला कान्हा भेटला. अगं, ह बघ. अरे, हा तर आपल्या कान्हाचा आहे. दोघी देवघरात गेल्या. तर कान्हाच्या हातात पावा होता. अगदी तसाचं. खुळी आहेस झालं. चल आता. आणि हो, उदया वडोदऱ्याहून पाहुणे येणार आहेत, तुला बघायला. बां.. नक ना.

अगं, मी पिकलं पान. माझ्या डोळ्यासमोर तुझं सगळं झालं की मी तुझ्या बाबाच्या शब्दातून मोकळी झाले. तसंच झालं. रावी कोठारीच्या घरी पसंद पडली. एवढ्या मोठ्या,नांदत्या घरात छोटी बहू म्हणून मिरवू लागली. घर कसलं गोकुळच होतं ते. ही सगळ्यांची लाडकी बहू, झाली. शांत, समंजस, नाजूक, गोड आवाजात बोलणारी. नवरा रमणची तर जीव की प्राण हती.तो पण पावा वाजवायचा, पण त्याला फक्त तीच सुरांसाठी असं वेड होणं खटकायचं. सासू, सासरे, पण तिच्या इतर सद्गुणांकडे बघून असू दे, अल्लडआहे, म्हणून दुर्लक्ष करायचे. आणि रावी.. तिने सासरी येतांना तो तिचा कान्हा तिथून आणला होता. ती काम आटोपलं की त्याच्याशी गुज करत बसे. ते आम्रवनातले सूर तिला बेचैन करत. ते सूर परत ओढून तिला तिथे नेत.तिथे अनुभवलेले हळुवार क्षण तिला बेचैन करत.तिचं मन हळवं होई. डोळ्यात पाणी येई.रमणला ह सारं तिनं सांगितलं होतं. अशा आपल्या निष्पाप, अबोध बायकोची मग रमण गोड शब्दात समजूत घाले. सुरेल असा पावा वाजवे. रावी त्यात रमून जाई.असा दोघांचा संसार छान चालला होता. त्या संसार वेलीवर छानसं फुलं उगवलं. जेव्हा ते बाळ पहिल्यादा तिनं हातात घेतलं आणि डोळे भरून पाहिलं तर तेच शामल सुंदर रुप, तसेच काळेभोर कमळासारखे डोळे आणि लांब सडक बोटं, कुरळे, कुरळे केस आणि दंडावर तसंच तुळशीपत्र. अधिरेपणानी तिने त्याला परत पाहिलं तेच रुप..तेच हसू.. तोच कृष्ण सावळा तिला पालवू लागला. कान्हा माझा कान्हा.. बाळाला तिनं घट्ट कुशीत घेतलं.

एका कोवळ्या भावनेनी, तिचे डोळे भरून आले. ती तृप्त नजरेनी त्याला पहात हती. तिला वेड लावणारे ते सूर त्या निर्मळ हास्यातून तिला गवसले होते. आणि तो शामल सावळा तिच्याकडे बघून मधुर हसत होता.. धुंद, मिस्कीलपणे .. आम्रवनात जसा हसला तसा..



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक सुख समृद्धी घेऊन येत आहे. तुम्हाला एखादे लहान ध्येय गाठता येईल. एखादी हवी असलेली वस्तू घेता येईल. आर्थिक लाभ होऊ शकतो. अस्थिर परिस्थिती सुधारेल. एकंदरीत हा काळ अगदी पूर्ण नाही पण काही प्रमाणात यश देणार आहे. या आठवड्यात तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. तुमच्या आर्थिक सक्षमतेने इतरांना मदत कशी करता येईल याचा विचार करा. संकुचित वृत्ती सोडा. मन मोठे करा. सगळ्यांना सामावून घ्या. तुमच्या वर्चस्वाचा गैरवापर करू नका. अहंकारासारखा दुसरा शत्रू नाही हे लक्षात ठेवा!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी तुमच्या हिंमतीचा कस लावणारा असणार आहे. जे काही करत आहात त्यात तुमच्या धडाडीची आणि स्वबळाची परीक्षा होऊ शकते. शेवटच्या टप्प्याजवळ काहीतरी अडथळा येऊ शकतो. थोडा विरोध होऊ शकतो. पण त्यावर मात करण्याची तुमच्याकडे ताकत असेल. म्हणून खचू नका, प्रयतकांती परमेश्वर ही उक्ती लक्षात ठेवा! या आठवड्यात जिद्दीने आणि चिकाटीने पुढे चाला. कुठल्याही जुन्या वाईट अनुभवामुळे स्वतःचे खच्चीकरण करू नका. शरीर स्वास्थ्याकडे नीट लक्ष द्या. आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी सक्षम आहात हा विश्वास ठेवा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी अधिकाराचा आणि वर्चस्वाचा असणार आहे. तुम्ही करत असलेले काम मोठे होईल. विस्तार होईल. तुम्हाला एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. बऱ्याच गोष्टींची सूत्रे तुमच्या हातात असतील. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने वागण्याची गरज आहे. वडील किंवा मोठ्या आदरणीय व्यक्तींचा दबदबा राहील. या आठवड्यात तुमचा आत्मविश्वास बळावेल. पण अती विश्वास, अभिमान, गर्व हे तुम्हाला बाधक ठरु शकतात. म्हणून पाय जमिनीवर ठेवा. सामर्थ्यवान अशी एखादी सुरुवात करा.

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयतक करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी दिलासादायक असणार आहे. तुमच्या शिक्षकांचा, मोठ्या व्यक्तींचा आणि साथीदारांचा तुम्हाला पाठिंबा मिळेल. काहीतरी नवीन शिकाल आणि शिकवाल. कर्तव्याला न चुकता काम केले तर समाधानकारक फळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मार्गदर्शक व्यक्तींचा सल्ला




अजिबात टाळू नका. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालून तुमचे चांगले होणार आहे. नियमात बसेल असेच वागा आणि त्याप्रमाणे काम करा. जोखीम किंवा चौकटीबाहेरच्या गोष्टींना आत्ता हात घालू नका. प्रयतकांना प्रार्थनेची शक्ती जोडा!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी तुमच्या बुध्दीने काम करण्याचे प्रसंग घेऊन येत आहे. महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. रुक्ष आणि रोखठोक वागणाऱ्या लोकांशी जुळवुन घ्यावं लागेल. कामामध्ये संकल्पना आखल्या जातील, नियोजन चांगले होईल. सक्षमतेने पुढे वाढाल. या आठवड्यात तुम्हाला तुमचे बोलणे स्पष्ट ठेवण्याची गरज आहे. संशयाला, खोट्याला अजिबात जागा ठेवू नका. नीट सारासार विचार करून, कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले हे सिद्ध करुन दाखवा.

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी काही प्रमाणात मागे येण्याचा असणार आहे. एक प्रकारे माघार घ्यावी लागेल. तुम्हाला हवे तसे घडणार नाही. अपेक्षित यश मिळण्यात काहीतरी कमतरता राहील. तडजोड करावी लागेल. पण हे करत असताना कोणाची तरी चांगली साथ मिळू शकते. प्रयतक करुन प्रगती होईल. प्रवास घडू शकतो. स्थलांतर होऊ शकते. या आठवड्यात तुम्हाला शांतपणे काम करण्याची गरज आहे. तुम्हाला तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. मध्यम मार्ग निवडा. थोडा वेळ शांत बसून आत्मचिंतन करा!

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी लोकांकडून मदत आणि पाठिंबा घेऊन येत आहे. इतरांवर अवलंबून असलेली कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. जुने मित्र किंवा नातेवाईक, मदतीसाठी तयार असणारे सज्जन लोक तुम्हाला भेटतील. एखादी लहान भेटवस्तू मिळेल. लहानांमध्ये मन रमेल. या आठवड्यात तुम्ही लोकांशी सलोखा करण्याचा प्रामाणिक प्रयतक करा. तुमच्या जवळच्या माणसांना तुमचं म्हणणं मोकळेपणाने सांगा, त्याने तुमचं नातं घट्ट व्हायला मदत होईल. घरातल्यांसोबत निवांत वेळ घालवा. जुन्या आठवणी ताज्या करा. मन जिंकून जग जिंका.

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावभावनांचं प्राधान्य घेऊन येत आहे. तुम्ही आनंदी राहणार आहात. तुम्हाला तुमच्या मनाचा कौल घेऊन, बुध्दी आणि इतर व्यवहारिक गोष्टींपेक्षा मन काय सांगत आहे त्याप्रमाणे वागून चांगला अनुभव येईल. कठीण परिस्थितीसुद्धा सकारात्मकतेने हाताळू शकाल. कला क्षेत्रात चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही भावनांमध्ये वाहवत जात नाही आहात ना, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कोणामध्येही भावनिक दृष्ट्या अडकू नका. तुम्हाला आवडणारा एखादा छंद किंवा एखादी कला आत्मसात करा, त्यात वेळ घालवा.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी एखादी नवीन संधी घेऊन येणार आहे. नवीन भौतिक आनंद, सुख सोयी अनुभवता येतील. अडकलेले काम सुटेल. कौटुंबिक सुख समृद्धी राहील. एकूण परिस्थिती सुधारेल. तब्येत चांगली होईल. घर, गाडी, नोकरी, व्यवसाय, जमिनीचे काम यासंदर्भात प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही सावकाश आणि चिकाटीने काम करण्याची गरज आहे. कामाच्या ठिकाणी एखादी नवीन योजना मांडा. नवीन सुरुवात करायची असेल तर करा. काम होण्याची शक्यता आहे पण ते पूर्ण होण्यासाठी संयम ठेवा!

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक आणि आर्थिक सक्षमता घेऊन येत आहे. आर्थिक कामे अडकलेली असतील तर ती आता मार्गी लागतील. आहात त्यापेक्षा चांगल्या परिस्थितीत पोचाल. एखाद्या गुंतवणुकीतून फायदा होऊ शकतो. अडकलेले पैसे मिळू शकतात. नोकरी व्यवसायामध्ये चांगले यश संभवते. आरोग्या सुधारेल. या आठवड्यात एखाद्या तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेऊन मग आर्थिक निर्णय घ्या. एखाद्या अनुभवी व्यक्तीचं मार्गदर्शन खूप उपयोगी पडेल. इतरांसाठी आधार बना. स्वार्थापलीकडे जाऊन लोकसेवा करा.

**मीन :** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. एखादं ध्येय किंवा एखादं पूर्ण होत आलेलं काम हुकण्याची शक्यता आहे त्यामुळे सतर्क रहा. कोणाकडून फसगत होण्याची शक्यता आहे म्हणून नवीन लोकांसोबत काम टाळा. प्रवासात तर होऊ शकतो म्हणून वेळेच्या आधीच घरातून निघा. तुम्ही केलेलं काम खात्री करून घेण्यासाठी दोन वेळा तपासून बघा. या आठवड्यात तुम्ही कोणत्याही बाबतीत सवलत घेऊ नका. नियम पाळा, त्यात दुर्लक्ष नको. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. पैशाचे व्यवहार किंवा इतर महत्वाची कामे या सप्ताहात शक्यतो करु नका.

## पान १ वरुन

## ना. देवेंद्रजी फडणवीसांची तळमळ

पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची आकडे हे आता खोक्यांमधून चर्चिले जातात. धुळे एलसीबीच्या खुर्चीवर येत्या काही दिवसात नवीन अधिकारी बसण्याची शक्यता आहे. मात्र यासाठी त्याची कार्यक्षमता तपासण्याऐवजी तो काय देऊ शकतो? यावर भर दिला जात आहे. हाताच्या पंजावर असणाऱ्या बोटांपेक्षा अधिक खोके देऊ शकणाऱ्याची आता एलसीबीच्या खुर्चीवर बदली होणार असेल तर जनतेने काय अपेक्षा कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत ठेवाव्यात हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर आपण गांभीर्याने विचार करावा.

नागपूर अधिवेशनामध्ये आपण गुटखा विरोधात भूमिका घेतली ती निश्चितच स्वागत आहे ज्या भूमिकेतून आपण गुटक्यावरती निर्बंध आणण्यासाठी प्रयत्न केला त्याचा आम्हाला अभिमान आहे. पण धुळे जिल्हा हा अर्ध्या महाराष्ट्राला गुटखा पुरवतो हे देखील खेदाने सांगवे लागेल. याच्यामागे मोठे रॅकेट आहे. धुळे जिल्ह्यातून या गुटक्याचे वितरण काही विशिष्ट गँगमार्फत होते व याची माहिती पोलीस खात्याला नाही असे नाही. नोव्हेंबर २०२४ अगोदरचे वर्षभरातील पेपर आपण चाळले तर दर चार दिवसानंतर गुटक्याचे ट्रक पकडल्याच्या बातम्या आम्ही छापल्याचे दिसून येईल. मध्यरात्री प्रवास करणाऱ्या परप्रांतातील लक्झऱ्यांमधून देखील गुटका सापडून आला आहे. नोव्हेंबर २०२४ नंतर मात्र अचानक कमी झाले. या सर्व घटना क्रमामध्ये कुठेतरी पाणी मुरते आहे. दुःख एवढेच वाटते की आपण पोटतिडकीने कायदे करतात. राज्य सुधारण्यासाठी वेगवेगळे नियम करतात. पण, ज्यांच्यावर या नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे ते या नव्याने झालेल्या कायद्याचा फायदा घेत आपले उखळ पांढरे कसे करता येईल यावर भर देत आहेत, हे आपल्या लक्षात आणून देणे आवश्यक झाले आहे. आपण ही बाब गांभीर्याने विचारात घ्याल व सक्षम पोलीस अधीक्षक धुळे जिल्ह्याला द्याल अशी आमची अपेक्षा आहे. सट्टा तर परमसिमेवर आहे. कोणतीही कारवाई होत नसल्याने घरंदाज, पत्रसृष्टीतील या व्यवसायाकडे वळत आहे ही फार मोठी शोकांतिका आहे.

राज्य सरकार आर्थिक अडचणीतून जात असताना आपण लोकहिताच्या विकासाच्या कामांना अधिक अधिक पतपुरवठा कसा होईल यासाठी प्रयत्नशील असतात. मात्र या पैशाचे नियोजन खरोखर योग्य प्रकारे होते आहे का नाही? याकडे लक्ष देणे आवश्यक झाले आहे. भ्रष्टाचाराचे नवनवीन प्रकार बघताना हे सगळे कुठे थांबणार? असा प्रश्न आम्हाला भेडसावत असतो. गेल्या काही वर्षापासून काम घेणाऱ्यांकडून डीपीडीसीतील पैसे वाटपावर टक्केवारीने पैसे वसूल केले जाते याची जोरदार चर्चा सर्व दूर ऐकायला मिळते. आता ही गाडी इथेच थांबलेली नाही, तर सेस फंडाचा सुद्धा पद्धतशीरपणे फडश्या पाडल्याचे बोलले जाते. या सगळ्यावर कुठेतरी तपासणी करणारी यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक झालेले आहे.

शासन ज्या वेगाने विविध कामासाठी पैसे पाठवतो ती कामे नक्की होता की नाही हे बघणे आवश्यक झाले आहे. अनेक ठिकाणी रस्ते कागदावरच तयार होत असल्याची प्रकरणे वाढू लागली आहे. आम्ही शिरपूर तालुक्यातील जळोद अभणपूर या आदिवासी भागातील रस्त्यावरील दीड कोटीचा पूल फस्त केल्याचे प्रकरण लावून धरले होते. तत्कालीन प्रधान सचिव मनोज सौनिक यांनी संबंधित डेप्युटी इंजिनियरवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश काढले. मात्र आदेशांवरती अंमलबजावणी तर दूरच राहिले त्यांची अधीक्षक अभियंता म्हणून नेमणूक झाली.

एका जिल्हा वृत्तपत्राला हे सर्व आपल्या धुळे जिल्ह्यातील दौऱ्यानिमित्त लक्षात आणून देणे आवश्यक होते. राज्यामधील कामकाजात आवश्यक त्या सुधारण्यासाठी आपली असणारी तळमळ निश्चितच लक्षवेधी आहे. मात्र जिल्ह्यात काय चाललंय हे देखील आपल्या नजरेस आणून देणे आवश्यक आहे. आपण यावर निश्चित उपाययोजना कराल अशी अपेक्षा आहे.

-संपादक

## पार्टी योग्य असती तर..

एवढ्या मोठ्या संख्येने लोक सोडून गेले नसते. भ्रष्टाचाराविरोधी आंदोलनातून हा पक्ष जन्माला आला, पण आता स्वार्थामुळे लोक विखुरत आहेत. आज समाज आणि देश विसरून नेते केवळ सत्ता आणि पैशाच्या मागे धावत आहेत, असा खेदही त्यांनी व्यक्त केला. शुक्रवारी दिल्लीत पत्रकार परिषदेत राघव चड्ढा, संदीप पाठक आणि इतर खासदारांनी अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पार्टी सोडण्याची घोषणा केली. चड्ढा यांनी दावा केला की, पक्षाचे दोन तृतीयांश राज्यसभा खासदार फुटले असून ते स्वतंत्र गट म्हणून भाजपमध्ये विलीन होत आहेत. राज्यसभेत आपचे संख्याबळ लक्षणीयरीत्या घटल्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे. अण्णा हजारे यांच्या प्रतिक्रियेमुळे आता आपच्या नैतिक अधिष्ठानावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आंदोलनातून उभा राहिलेला पक्ष आता मूळ विचारांपासून दूर गेल्याची टीका विरोधकांकडूनही होत आहे.

## वसंत सुर्यवंशी यांचे दुःखद निधन

म्हणून केली. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य, सभापती अशी विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. गावपातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. पुढे साक्री विधानसभा मतदारसंघातून भारिप बहुजन महासंघाच्या तिकिटावर ते आमदार म्हणून निवडून आले आणि जनतेच्या अपेक्षांवर खरे उतरले. राजकारणातील संघर्षमय वाटचालीत त्यांनी अनेक चढ-उतार अनुभवले. एकेकाळी जिल्ह्याचे बलाढ्य नेते व माजी मंत्री दादासाहेब सुरुपसिंग नाईक यांच्या विरोधात नवापूर विधानसभा निवडणूक लढवून त्यांनी आपली राजकीय ताकद दाखवली. त्यांच्या निधनामुळे राजकारणातील एक लढवय्या योद्धा हरपला असून, त्यांच्या कार्याचा ठसा कायम समाजाच्या मनात जिवंत राहील.अशा भावना कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

## चोवीस तासात घरफोडी उघडकीस

पोलीस अधीक्षक अशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास पथकात सहायक पोलीस निरीक्षक राकेश बळवंत, पोलीस कर्मचारी दीपक बारके, पी.एस.आय. राजपूत यांचा सहभाग होता.

## भवानी माता यात्रेत दोन गटात हाणामारी

शिंदे, कुणाल शिंदे आणि भालेराव शिंदे यांनी त्यास ओढून खाली पाडले. तुम्ही मुलींकडे का बघता? अशी विचारणा करत या तरुणांनी विशाल व जयेश चव्हाण यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.या फिर्यादीत आरोप करण्यात आला आहे की, दिनेश शिंदे, सागर शिंदे, श्याम शिंदे यांनीही गर्दी जमवून मारहाण केली. तसेच जयेश चव्हाण हा घरी जात असताना वैशाली शिंदे व सुवर्णा शिंदे यांनी त्याला रस्त्यात अडवून मारहाण केली. या गटातील जखमींवरही धुळे येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. दोन्ही गटांनी दिलेल्या तक्रारींनंतर सोनगीर पोलिसांनी एकूण १५ हून अधिक जणांविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व दंगलसदृश परिस्थिती निर्माण केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत. पोलीस प्रशासनाने गावात शांतता राखण्याचे आवाहन केले असून घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रवींद्र बागुल करीत आहेत.

## माता रमाई स्मारकासाठी जागा द्या

स्मारकाला धुळे महानगरपालिकेमध्ये जागा मिळवून द्यावी. अशा मागणीचे निवेदन आरपीआय आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत वाघ, प्रभाकर जाधव, एस.आर.बागुल, राजु शिरसाठ, नयना दामोदर, संजय शिंदे, सरला निकम, संजय बैसाणे, आबा खंडारे, प्रेम अहिरे, मनी खैरनार, आरती सोनवणे यांनी महापौर परदेशी यांना दिले आहे.

## पान १ वरुन

## मोरे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी

स्वीकारल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आणि पक्ष पुन्हा मुख्य प्रवाहात आला.नंदुरबार जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघ हे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. डॉ. अभिजित मोरे हे मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करत असल्याने त्यांना थेट निवडणूक लढवण्याची संधी उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांच्या कार्याची आणि निष्ठेची दखल घेऊन त्यांना विधान परिषदेवर नियुक्त करावे, ही संपूर्ण जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची भावना असल्याचे कुवर यांनी नमूद केले.ज्यांनी कठीण काळातही पक्षाची साथ सोडली नाही, अशा सच्च्या कार्यकर्त्याचा सन्मान होणे आवश्यक आहे. डॉ. अभिजित मोरे यांची विधान परिषदेवर निवड होणे हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, तो नंदुरबारच्या मातीचा आणि सामान्य कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा विजय ठरेल, असा विश्वास सुरेंद्र कुवर यांनी व्यक्त केला आहे.

आता संधी सन्मानाची आणि वेळ न्यायाची असल्याची भावनाही त्यांनी यावेळी बोलून दाखवली. निवेदन देताना श्री. कुवर यांच्यासोबत शहादा तालुकाध्यक्ष संतोष पराडके,माजी जिल्हा परिषद सदस्य मोहन शेवाळे, मिडिया सेलचे छोटूभाऊ कुवर, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संजय खंदारे, जिल्हा सचिव चिंतामण पाटील, डॉ.जितेंद्र भंडारी,रणसिंग दादा, रविंद्र जावरे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## आदितीताई ढिकले यांचे निधन

या दुःखद घटनेची माहिती मिळताच त्यांनी आपले नाशिकमधील पुढील सर्व कार्यक्रम रद्द केले. कुंभमेळा बैठक, पुरोहित संघाची बैठक मुख्यमंत्र्यांकडून रद्द करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी ढिकले यांच्या निवासस्थानी धाव घेत आदिती ढिकले यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार प्रा.देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज अहिरे, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, तहसलीदार पंकज पवार, अपर तहसीलदार अमोल निकम आदींसह नेते मंडळी व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघाच्या आमदार देवयानी फरांदे व पश्चिम विधानसभेच्या आमदार सीमा हिरे, भाजप शहराध्यक्ष सुनिल केदार यांनी देखील शोक व्यक्त केला.

## मतदान,मतमोजणीसाठी आठवडे बाजार बंद

तालुका- कुढावद, अंबापूर व इस्लामपूर या ठिकाणांचा समावेश आहे. नवापूर तालुका- खांडबारा, सोनपाडा, झामट्यावड, तारापूर तसेच खातगाव, बिलबारा या ग्रामपंचायत क्षेत्रांतील बाजार बंद राहतील. अक्राणी तालुका- सोन बुद्रुक व डोमखेडी (येथे आठवडे बाजार बंद ठेवण्यात येणार आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततेत व निर्बाध पार पडावी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांच्याकडून करण्यात आले आहे.

मतमोजणी केंद्र- ग्रामपंचायत निवडणुकीअंतर्गत दि.२९ एप्रिल (बुधवार) रोजी मतमोजणी प्रक्रिया संबंधित तहसील मुख्यालय स्तरावर पार पडणार आहे. त्यानुसार तालुकानिहाय मतमोजणी केंद्रांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे: अक्कलकुवा तालुका- तहसील कार्यालय, अक्कलकुवा येथे मतमोजणी केंद्र; या ठिकाणीही आठवडे बाजार बंद राहणार आहे. तळोदा तालुका- तहसील कार्यालय, तळोदा येथे मतमोजणी केंद्र; येथेही आठवडे बाजार बंद ठेवण्यात येणार आहे. शहादा तालुका- तहसील कार्यालय, शहादा येथे मतमोजणी केंद्र; या परिसरातही आठवडे बाजार बंद राहतील. नवापूर तालुका- तहसील कार्यालय, नवापूर येथे मतमोजणी केंद्र; येथेही आठवडे बाजार बंद राहणार आहेत. अक्राणी तालुका- तहसील कार्यालय, अक्राणी (धडगाव) येथे मतमोजणी केंद्र; या ठिकाणीही आठवडे बाजार बंद ठेवण्यात येणार आहे.

या सर्व मतमोजणी केंद्रांवर निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सर्व व्यवस्था केल्या आहेत. तसेच, मतमोजणीच्या दिवशी संबंधित तहसील मुख्यालय परिसरात आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश लागू राहतील, असेही जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी स्पष्ट केले आहे.

## नवापूर येथे अवैध दारूचा साठा जप्त

आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ९२ लाख ,७८, हजार ४६० रुपये इतकी आहे.आरोपीविरुद्ध नवापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कलम ६५(अ), १०८, ८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अपर पोलीस अधीक्षक अशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास पाटील, पोलीस कर्मचारी तांबे, जिरे, वाघमारे, निंबाळकर, गायकवाड, राजपूत आदींचा सहभाग होता.

## वकील संघ अध्यक्षपदी अॅड.भामरे

नवीन कार्यकारिणीकडून वकिलांच्या हिताच्या योजना, न्यायालयीन सुविधांमध्ये सुधारणा आणि संघटन अधिक बळकट करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. धुळे जिल्हा वकील संघाची ही निवडणूक नेतृत्व आणि विश्वासाचा कौल ठरली. अध्यक्षपदी अॅड.राहुल भामरे यांच्या निवडीसह संपूर्ण टीमकडून सकारात्मक आणि प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे, तर अॅड.उमाकांत घोडराज यांच्या सलग तिसऱ्या विजयाने निवडणूकीत विशेष ठसा उमटवला आहे. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून आपल्या पारदर्शक कार्याचा ठसा उमटवत अॅड.आनंद जगदेव यांनी सलग सहाव्यांदा, अॅड.मनोज देवरे यांनी तीसऱ्यांदा तर अॅड. राजेश अग्रवाल यांनी पहिल्यांदा जबाबदारी सांभाळली.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## अमरीशभाईसारखे नेते देशाचे भूषण : मुख्यमंत्र्यांचे गौरवोद्गार

(पान १ वरुन) रंधे, माजी अध्यक्षा धरती देवरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी, सुभाष देवरे, शिवाजी दहिते, शामकांत सनेर, विजय चौधरी, दीपक पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, केतकीबेन पटेल, कृतीबेन पटेल, मेहा पटेल, देवेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, की शिरपूर तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल आणि अरुणावती नदीवर बंधारे बांधण्यास मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. धुळे जिल्ह्यामध्ये गेल्या दीड वर्षात तब्बल ४० हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक आली असून, भविष्यात धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे राज्याची प्रमुख औद्योगिक केंद्रे बनतील. त्यांच्याहस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाने विकसित एआय आधारित ई सुविधा पोर्टलचे लोकार्पण, आयुर्वेदिक कॉलेज, अॅग्रीकल्चर कॉलेज व फार्मसी कॉलेज, तरडी, आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, निमझरीचे सुदूर यंत्रणेद्वारे उद्घाटन, खर्दे येथील वैद्यकीय महाविद्यालय इमारत, नटवाडे येथील याहामोगा माता मंदिर, क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा स्मारक आणि क्रांतिवीर खाज्या नाईक स्मारक आणि दहिवदच्या मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे भूमिपूजन करण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, स्वातंत्र्यानंतरच्या काळात अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासोबतच आता शिक्षण, आरोग्य व रोजगार या प्रमुख गरजा बनल्या आहेत. याच त्रिसूत्रीवर भर देत शिरपूरने साधलेला विकास राज्यासाठी दिशादर्शक आहे. एकविसाव्या शतकात उद्योग केवळ पैशावर नाही, तर कुशल मनुष्यबळावर चालतात. शिरपूरमध्ये उभारण्यात आलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कृषी महाविद्यालयांमुळे हे शहर आता उत्कृष्ट मानवी संसाधन पुरवणारे मोठे केंद्र बनले आहे. तसेच, मुंबई किंवा पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या तोडीचे अत्याधुनिक रुग्णालय आदिवासी भागात उभारून जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शिरपूर येथे आयटी पार्कसाठी अँकर इन्व्हेस्टर शोधून त्याच्याशी आयटी पार्कबाबत चर्चा करण्यात येईल व आयटी पार्क उभारण्याबाबत प्रयतक करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. धुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्ह्यांमधील समावेशानंतरच्या गेल्या दीड वर्षांत जिल्ह्यात तब्बल ४० हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक आली आहे. यात प्रामुख्याने रसायन व अन्नप्रक्रिया क्षेत्रात १ हजार ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक निश्चित झाली असून, केवळ सामंजस्य करार न करता हे उद्योग प्रत्यक्ष उभारले जातील. याशिवाय, दोंडाईचा येथील २५० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प हरित ऊर्जेच्या दृष्टीने एक मोठा टप्पा ठरणार आहे. महामार्गांचे जाळे, सिंचन व्यवस्था, मुंबई-दिल्ली औद्योगिक पट्टा आणि इंदूर-मनमाड रेल्वेमुळे या भागात एक मोठी व सक्षम औद्योगिक परिसंस्था तयार झाली आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

महसुली जमिनीच्या पट्ट्यांवर मिळणाऱ्या सर्व शासकीय योजना लवकरच वन जमिनीच्या पट्ट्यांवरही लागू केल्या जातील, अशी घोषणा करून यामुळे आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिरपूर आणि परिसराच्या सर्वांगीण विकासात आपण तालुक्याच्या पाठीशी एका भावासारखे पूर्ण ताकदीने उभे राहू, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

पालकमंत्री श्री.रावल म्हणाले, शिरपूरमध्ये शिक्षण, सिंचन व उद्योग क्षेत्रात मोठे काम उभे राहिले आहे. देशात प्रथमच सुरू झालेली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रशासकीय प्रणाली व नव्याने सुरू झालेले वैद्यकीय महाविद्यालय जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. तपनभाई पटेल यांच्या नावाने सुरू झालेले हे अद्ययावत रुग्णालय खान्देशातील लोकांसाठी मोठी आरोग्य सुविधा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वस्त्रोद्योग मंत्री सावकारे म्हणाले, शिरपूर येथील हे नवे रुग्णालय केवळ शिरपूर किंवा धुळे जिल्ह्यासाठीच नव्हे, तर जळगाव, नंदुरबार व शेजारील मध्य प्रदेशातील रुग्णांसाठीही जीवनदान ठरेल. शिरपूर येथील शिक्षणाचा दर्जा उत्तम असून संस्थांमध्ये प्रवेशासाठी गुणवत्ता निकष काटेकोरपणे पाळले जातात. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या शहरांत जाण्याऐवजी येथेच शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. नगरपालिकेने राबवलेले उपक्रम व निर्माण केलेल्या रोजगाराच्या संधींमुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानांच्या विकसित भारत २०४७ या संकल्पनेनुसार राज्याची वाटचाल सुरू आहे. प्रत्येक शहराची व तालुक्याची क्षमता ओळखून तिथे विकासकामे केली जात आहेत, ज्यामुळेच गडचिरोलीसारखा जिल्हा आज देशाचे पोलाद केंद्र म्हणून उदयास येत आहे. प्रशासकीय कामांचा सूक्ष्म पाठपुरावा करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम मुख्यमंत्री करत आहेत, असेही श्री.सावकारे यांनी सांगितले.

आमदार श्री.पटेल म्हणाले, शिरपूरमध्ये सर्वसामान्यांना अत्यंत कमी खर्चात आरोग्य सेवा देण्यासाठी १ हजार २०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय सुरू करण्यात आले आहे. या रुग्णालयाचा फायदा धुळे, नंदुरबार, जळगाव व खंडवा परिसरातील गरिबांना होईल. परिसरातील शेती, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि रोजगार निर्मिती क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. सुमारे पंधरा ते सतरा हजार तरुणांना वस्त्रोद्योग प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध करून दिला आहे, ज्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे, असेही त्यांनी सांगितले.प्रास्ताविकात आमदार पावरा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याची विकासाकडे वाटचाल सुरू आहे. त्यांच्याकडे विकासाची दृष्टी आहे. पटेल कुटुंबामुळे शिरपूर तालुक्याचा सर्वांगीण विकास होत आहे. शिरपूर तालुका आदिवासीबहुल आहे. या भागासाठी रस्ते करण्यासाठी वन विभागाच्या अटी शिथिल व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा.विद्या पाटील यांनी सूत्रसंचलन केले. सुभाष कुलकर्णी यांनी आभार मानले.

## धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या ई सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**धुळे, दि.२५- धुळे जिल्हा प्रशासनाने एआय आधारित तयार केलेल्या ई सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले.**

यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महापौर मायादेवी परदेशी, आमदार अमरिशभाई पटेल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, काशीराम पावरा, मंजुळा गावित, राघवेंद्र भदाणे, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या या पोर्टलबद्दल पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे अभिनंदन केले. धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या एआय आधारित इंजिनमुळे प्रशासनाचा कारभार गतिमान होऊन पारदर्शकता वाढेल. यामुळे लोकांची कामे सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी या पोर्टलची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम, टक्के ई-गव्हर्नन्स, टीसीएच तत्त्वे, तहसील ते मंत्रालय कार्यक्षमता या दृष्टीकोनातून प्रेरणा घेऊन पालकमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाने, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे यांनी ई-सुविधा हे कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित जिल्हा व्यवस्थापन पोर्टल विकसित केले आहे.

पाहिजे
हॉटेल कामासाठी वेटर पाहिजे.
-: संपर्क :-
9403300128

पाहिजेत
कामासाठी माणुस लावणे आहे.
भाग्यश्री ट्रेडींग कंपनी
पारोळा रोड, प्रकाश टॉकीज समोर, धुळे
-: संपर्क :-
9423135555

घर भाड्याने देणे
२ रुम स्टोरुम घर भाड्याने देणे आहे. टेरेस मोठा आणि नवकार नगर मधील प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9404550871

विकणे आहे
शहराच्या मध्यवर्ती असलेली १६x६३ जागा त्वरित विकणे आहे. तसेच जुन्या पिठाच्या गिरण्या व वेल्डींगची मशिनरी त्वरित विकणे आहे.
-: संपर्क :-
7744010511
8888269758

श्री नेत्रालय हॉस्पिटल
नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

मुले पाहिजेत
विकास दुध (पाऊच पॅकींग) वाटपासाठी पार्टटाईम मुले पाहिजेत.
समक्ष भेटा. स. ११ ते १२
विकास दुध, १४८४ नवग्रही ग.नं.२, पारोळा रोड, उषा ड्रेसेस समोर, धुळे
9890030422
8600773021

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे. फोनः (02562) 229162, 235763

बंगला भाड्याने देणे
सर्व सोयीयुक्त बंगला ४ व्हीलर पार्कींग, २४ तास पाणी, गार्डन, रोडटच, भरत नगर देवपुर, धुळे
-: संपर्क :-
9011237323
9421617354

पाहिजेत
कापड दुकानामध्ये माल जोडणेसाठी मुले-मुली, महिला पाहिजेत.
व सेल्समनही हवेत.
समक्ष भेटा- राकेश कापड दुकान, जेबी रोड, धुळे
9423941247

पाहिजेत
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच अॅण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

बंगला भाड्याने देणे
ऑफिससाठी सहा रुमचा बंगला भाड्याने देणे आहे.
जी.टी.पी. स्टॉप ३४, बडगुजर कॉलनी, देवपुर, धुळे
-: संपर्क :-
9028111356

शेण खत विकणे आहे
दोंडाईचा येथील गौशाळेचे(देशी गायी) शेण खत विकणे आहे.
राहुल पाटील
8329300690
9421527513

घर विकणे आहे
समतानगर दुध डेअरी रोड, स.नं.४८८/१, प्लॉट नं.७ चे १७९८ उत्तरेकडील ८०० चौफुट बांधकाम विकणे आहे.
-: संपर्क :-
9403088529
9420814159

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.बी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०